cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५२ | शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

मुंबईः राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयानुसार आता राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर दिले जाणार असून, यासाठी १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयाने पालकांना दिलासा मिळणार आहे. राज्यातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे. इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवी अशा दोन गटांतील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन ही दप्तरे पुरवली जाणार आहेत. या दप्तरांची खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे पारदर्शक पद्धतीने केली जाणार असून, यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून निविदेचे प्रारूप तयार केले जाणार आहे. शालेय साहित्याचा खर्च हा अनेकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पालकांसाठी अतिरिक्त आर्थिक भार ठरतो.

### म.फुले समग्र वाङ्मयचा सात भाषांमध्ये अनुवाद

पुणेः महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र वाङ्मयाचा ग्रंथ हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या सात भाषांमध्ये अनुवाद करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी आज प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे एक दिवशीय अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. मराठीतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा विविध भाषांमध्ये तसेच विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

### मराठी न येणाऱ्या १,२६८ रिक्षा चालकांना नोटीस जारी

मुंबईः राज्य सरकारने ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालवणाऱ्या व्यावसायिक चालकांसाठी व्यावहारिक मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य केले आहे. या निर्णयाचा मुख्य उद्देश चालक आणि प्रवाशांमधील संवाद अधिक चांगला आणि सुलभ करणे हा आहे. या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने गुरुवारपासून संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. मोहिमेच्या पहिल्याच टप्प्यात मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान नसलेल्या एकूण १,२६८चालकांना नोटीस बजावण्यात आली आहे. मुंबई आणि उपनगरात मोठ्या प्रमाणात अमराठी रिक्षा चालक आहेत. अशातच आता मुंबई आणि आसपासच्या परिसरात परिवहन विभागाच्या पथकांकडून विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. एमएमआर भागातील एकूण ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३५.०० क्विंटल | २,४२० | २,८९५ | २,५७७ |
| ज्वारी/हायब्रिड : ७०.०० क्विंटल | २,००० | ५,२०१ | २,७३३ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १९.०० क्विंटल | २,१७१ | २,७२६ | २,५४९ |
| मुग: ८.५० क्विंटल | ८,७०० | ८,८०० | ८,७५० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: २९.०० क्विंटल | ५,२०० | ६,००० | ५,७३२ |

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात सांगलीत शेतकऱ्यांचा एल्गार

# ‘प्राण देऊ पण जमीन देणार नाही’

सांगली । प्रतिनिधी

**‘गरज नसलेला शक्तिपीठ महामार्ग रद्द करा’, अशी जोरदार मागणी करत शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने गुरुवारी (दि. २१ ऑगस्ट) सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी, महिला तसेच सर्वपक्षीय नेते सहभागी झाले. शक्तिपीठ महामार्ग कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. ‘प्राण देऊ पण शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन देणार नाही’, ‘जमीन आमच्या हक्काची, नाही कोणाच्या बापाची’, ‘शक्तिपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे’, अशा घोषणा देत आणि हातात विविध फलक घेत शेतकऱ्यांनी आपला संताप व्यक्त केला.**




सांगलीचे खासदार विशाल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार जयंत पाटील, काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांच्या उपस्थितीत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या वेळी बोलताना राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्गाच्या प्रस्तावावर तीव्र आक्षेप घेतला. या महामार्गामुळे तब्बल २५ हजार एकर शेतजमीन बाधित होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांना महापुराच्या संकटात लोटणारा हा महामार्ग असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाची गरजच नसल्याची भूमिका त्यांनी पुन्हा स्पष्ट केली. आमदार जयंत पाटील यांनीही सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ‘‘ज्या-ज्या गावांतून शक्तिपीठ महामार्ग जात आहे, त्या सर्व गावांतील शेतकरी येथे आले आहेत. कधी नव्हे ते शेतकरी महिलाही रस्त्यावर उतरल्या आहेत. लोक नको म्हणत असताना सरकार हा रस्ता का करत आहे, असा प्रश्न महाराष्ट्रातील जनतेला पडला आहे,’’ असे ते म्हणाले.‘‘आम्ही गावांना जोडणारे रस्ते आणि पाणंद रस्ते मागत आहोत; मात्र ते ▶▶ पान २ वर

# खासदार पुत्राच्या अटकेसाठी बीडमध्ये विराट मोर्चा!

## विलास घुले यांना न्याय देण्यासाठी ॲड.गुणरत्ने सदावर्ते यांच्यासह उपस्थित बांधवांची आक्रमक भुमिका







बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील टाकळी येथील स्व.विलास घुले यांना न्याय मिळावा, खासदार पुत्राला अटक करावी, यासह विविध मागण्यांसाठी स्व.घुले यांच्या पत्नी सुषमा घुले, भाऊ रमेश घुले आणि ६० वर्षीय आशाबाई घुले यांचे मागील १८ दिवसांपासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी शुक्रवारी (दि.२१) बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात जिल्ह्यातील विविध भागांतून समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

मोर्चेकऱ्यांनी खासदार पुत्राला तत्काळ अटक करावी, घुले कुटुंबीयांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, त्यांच्या कुटुंबाला पोलिस संरक्षण उपलब्ध करून द्यावे, स्व. विलास घुले यांच्या पत्नीला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे आणि आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली. मोर्चादरम्यान सहभागी नागरिकांनी विविध घोषणा देत शासनाचे लक्ष वेधले. व्यासपीठावर ओबीसी नेते तथा माजी आमदार नारायणराव मुंडे, आरक्षण अभ्यासक ॲड.गुणरत्न सदावर्ते, जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, भगवान सेनेचे अध्यक्ष चंद्रकांत सानप, ओबीसी आंदोलक बट्रूळे बाबा, ॲड.जयश्री पाटील, ॲड.मंगेश ससाणे, धनराज गुट्टे, बळीराम खटके, मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस, ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रदेश प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, नगरसेवक सतीश बडे, ॲड.भाऊसाहेब लटपटे, माऊली सिरसट, मोहन आघाव, ॲड.राहुल आघाव, केशव तांदळे, ▶▶ पान २ वर

### अटक होत नाही, तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही–ॲड. गुणरत्न सदावर्ते

मला खासदार किंवा आमदार व्हायचे नाही. कोणालाही टेंडर मिळवून देण्याचे माझे काम नाही. विलास घुले कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी मी या लढ्यात सहभागी झालो आहे. कुटुंबीयांना घेऊन पोलीस महासंचालकांची भेट घेतल्यानंतर एका तासात तपास सीआयडीकडे देण्यात आला. बजरंग सोनवणे यांच्या मुलाला अटक होत नाही, तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे आरक्षण अभ्यासक ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी सांगितले. घुले कुटुंबीयांच्या उपोषणाची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेतली नाही. प्रतिसाद मिळत नसल्याने घुले यांच्या पत्नीने विष प्राशन केले. न्याय देताना दुजाभाव खपवून घेतला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. मनोज जरांगे हे मंत्र्यांवर टीका करत असताना या प्रकरणावर गप्प का आहेत, असा सवालही त्यांनी केला.

# साखरेचे दर वाढले




पुणे । प्रतिनिधी

**साखरेचे वाढते दर पाहता तर प्रत्येक साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना टनामागे ५०० रुपयांचा दुसरा हप्ता द्यायला हवा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली आहे. आधीची साखर कमी दराने विकली असली तरी शिल्लक साखरेला मिळणारा दर पाहता ४०० ते ५०० रुपये ऊस उत्पादकांना देण्यास अडचण नाही, असे त्यांनी म्हटले आहे.**


अचानक साखरेच्या दराने घेतलेली उसळी, कुठेतरी संशयास्पद असल्याचे सांगत त्यांनी साखरेच्या बाजारात २० ते २२ हजार कोटींचा काळाबाजार होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. एकूण पीक-पाणी पाहता पुढील हंगामात देशाला पुरेल इतके साखरेचे उत्पादन होणार आहे, हे स्पष्ट आहे. सरकारने साखर आयातीचा निर्णय घेतला असला तरी ऑक्टोबरच्या आधी बाहेरच्या देशातून साखर काही येऊ शकत नाही, असाही दावा त्यांनी केला. कारखान्यांतील शिल्लक साठा पाहिला तर अगदी दिवाळी होऊनसुद्धा आपल्याला पुरेशी साखर शिल्लक राहील. असे असताना साखरेच्या दराने संशयास्पद उसळी घेणे, यात कुठेतरी पाणी मुरतंय असे दिसते. मी शेतकरी नेता आहे. ▶▶ पान २ वर

# सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी निवड अवैध!

## नेते सच्चिदानंद सिंह यांच्याकडून पून्हा स्मरणपत्र नोटीस; निवडीवर प्रश्नचिन्ह

दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांच्या निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक नवीन नोटीस पाठवली आहे. २६ फेब्रुवारी रोजी झालेली संघटनात्मक निवडणूक अवैध असल्याचा दावा त्यांनी यात केला आहे.



सिंह यांच्या वकिलांनी ही स्मरणपत्र नोटीस बजावली. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी गेल्या महिन्यातच, राष्ट्रवादीत कोणतीही फूट पडलेली नाही आणि सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आव्हान देणारी जी पहिली नोटीस पाठवली होती तिला काहीही अर्थ नाही, असे स्पष्ट केले होते, तरीही ही नवीन नोटीस पाठवण्यात आली आहे. सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल आणि सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना पाठवण्यात आलेल्या या नवीन नोटीसमध्ये म्हटले की, ९ जुलै रोजीच्या त्यांच्या आधीच्या नोटीसमध्ये केलेल्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी त्यांना १५ दिवसांची अंतिम संधी दिली जात आहे. मागण्या पूर्ण न झाल्यास, २६ फेब्रुवारीची निवडणूक रद्दबातल ठरवण्याची मागणी करण्यासाठी सिंह योग्य त्या मंचाकडे दाद ▶▶ पान २ वर

# मोदींच्या २५ वर्षांच्या राजकीय प्रवासाचा गौरव

● भाजप साजरा करणार देशव्यापी सेवा संकल्प महोत्सव

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण होणार आहेत. हा महत्त्वाचा टप्पा साजरा करण्यासाठी, भाजप देशव्यापी सेवा संकल्प महोत्सव साजरा करणार आहे. भाजपच्या मते, हा कार्यक्रम एक देशव्यापी जनसंपर्क मोहीम आहे.

७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून प्रथम पदभार स्वीकारल्यापासून पंतप्रधान मोदी राजकारणात खंड न पडता सतत सक्रिय आहेत. त्यांनी जवळपास १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि त्यानंतर गेल्या १२ वर्षांपासून भारताचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले आहे. पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व या महोत्सवाची रूपरेषा निश्चित करण्यात पूर्णपणे व्यस्त आहे. भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन शनिवारी मोहिमेच्या तयारीचा सविस्तर आढावा घेणार आहेत. या महत्त्वाच्या बैठकीसाठी सर्व प्रदेशाध्यक्ष, संघटनांचे सरचिटणीस, राज्य प्रभारी आणि सह-प्रभारी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.



तळागाळातील स्तरावर उत्तम समन्वय साधणे हा यामागील उद्देश आहे. या राष्ट्रीय मोहिमेचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी, पक्षाने भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची ▶▶ पान २ वर

# शाळेची पाहणी करायला गेलेल्या सीजेपीच्या कार्यकर्त्यांवर हल्ला

## आशुतोष रांकाच्या गाडीवर दगडफेक, अभिजीत दिपकेंचा भाजपावर आरोप

जयपूर । वृत्तसंस्था

**कॉकरोच जनता पार्टीने देशभरात ‘शाळा ठीक करा’ ही मोहीम हाती घेतली आहे. सरकारी शाळांची पाहणी करून तेथील दुरवस्था दाखवली जात आहे. पायाभूत सोयी-सुविधांची वाणवा असून त्याबाबत सरकारला जाब विचारला जात आहे. सीजेपीच्या या मोहिमेला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. मात्र जयपूरमध्ये सरकारी शाळेची पाहणी करण्यासाठी गेलेल्या सीजेपीच्या आशुतोष रांका आणि इतर कार्यकर्त्यांवर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या घटनेला भाजपाचे गुंड जबाबदार असल्याचा आरोप सीजेपीने केला आहे.**



जयपूरमधील बागरू विधानसभा मतदारसंघातील एका सरकारी शाळेत सीजेपीचे सह संयोजक आशुतोष रांका आपल्या कार्यकर्त्यांसह पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी गावातील लोकांनी त्यांचा विरोध केला. रामपुरा कंवरपुरा या गावात स्थानिकांनी सीजेपीच्या पथकावर हल्ला केल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. या हल्ल्यात सीजेपीचा एक कार्यकर्ता गंभीर जखमी झाल्याचा दावा करण्यात येत आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना आशुतोष रांका म्हणाले, ‘‘आज संपूर्ण देशाने भाजपाची गुंडगिरी पाहिली. पोलिसांना हा प्रकार आधीपासून माहीत होता. तरीही त्यांनी हात वर केले आणि आम्ही काहीच करणार नाही, असे सांगितले. मदन दिलावर यांच्या सांगण्यावरून हल्ला करण्यात आला आहे. गुंडानी आधीच दगड आणून ठेवले होते. आमच्या एका कार्यकर्त्याचा हात ▶▶ पान २ वर

# कथित पॅलेट गन गैरवापर प्रकरणात अखेर गुन्हा दाखल



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राजधानी दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पॅलेट गन (छर्रे) गैरवापर प्रकरणात अखेर दिल्ली पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी आणि पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी संसद मार्ग पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी पीडित विद्यार्थ्याच्या तक्रारीची दखल घेत ही कारवाई केली. ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# शाळेत जायचे की सत्य लपवायचे?

राजस्थानातील सरकारी शाळांची अवस्था पाहण्यासाठी गेलेल्या कॉकरोच जनता पार्टीचे सहसंयोजक आशुतोष रांका आणि त्यांच्या सहकाऱ्यांना कथित मारहाण झाल्याच्या घटनेने केवळ राजस्थानच नव्हे, तर देशातील शिक्षणव्यवस्थेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहेत. जयपूरच्या बगरू विधानसभा मतदारसंघातील रामपुरा कनवारपुरा गावाजवळ शुक्रवारी हा प्रकार घडल्याचा रांका यांचा आरोप आहे. या हल्ल्यात एका स्वयंसेवकाचा हात फ्रॅक्चर झाल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

रांका आणि त्यांच्या टीमचा उद्देश कोणत्याही सरकारी शाळेचा राजकीय कार्यक्रम घेणे नव्हता, तर तेथील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांची पाहणी करणे हा होता. मात्र, शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर त्यांना अडवण्यात आले आणि त्यांच्यावर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेचा व्हिडिओही समोर आला असून, त्यात काही लोक सीजेपी कार्यकर्त्यांना घेरताना दिसतात. घोषणाबाजीचे आवाजही ऐकू येतात. हल्लेखोर भाजपचे कार्यकर्ते असल्याचा आरोप रांका आणि सीजेपीने केला आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र पुष्टी होणे आवश्यक आहे. मुद्दा केवळ रांका यांच्यावरील कथित हल्ल्याचा नाही. त्याहून मोठा प्रश्न आहे तो सरकारी शाळांच्या अवस्थेचा आणि त्या अवस्थेकडे पाहण्याची प्रशासनाची तयारी किती आहे याचा. रांका यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शाळेची इमारत खराब अवस्थेत असून, विद्यार्थ्यांना मुख्य इमारतीऐवजी सुमारे ५० मीटर अंतरावरील पत्र्याच्या शेडमध्ये शिकावे लागत आहे. त्या ठिकाणी जनावरांचा चारा असल्याचे आणि इमारतीच्या काही भागातील विटा कोसळल्याचेही त्यांनी सांगितले. जर हे आरोप खरे असतील, तर ही परिस्थिती कोणत्याही सरकारसाठी लाजिरवाणी आहे. कारण शिक्षणाचा अधिकार कागदावर देऊन उपयोग नाही; विद्यार्थ्यांना सुरक्षित इमारत, स्वच्छ पाणी, योग्य वर्गखोल्या आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे. विशेष म्हणजे, अलवरमधील थानागाझी येथील सरकारी शाळेला सीजेपी ने १५ ऑगस्ट रोजी भेट देऊन तेथील परिस्थितीवर आंदोलन केले होते. प्रशासनाने शाळेच्या दुरुस्तीपासून अतिरिक्त वर्गखोल्या आणि पिण्याच्या पाण्यापर्यंतच्या मागण्यांवर लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन थांबले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी माध्यमिक शिक्षण विभागाने सरकारी शाळांमध्ये बाहेरील व्यक्तींच्या प्रवेशावर निर्बंध घालणारे निर्देश जारी केले.

विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा निश्चितच महत्त्वाचा मुद्दा आहे. अल्पवयीन विद्यार्थ्यांचे छायाचित्रण, मुलाखती, व्हिडिओ किंवा थेट प्रक्षेपण याबाबत नियम असणे आवश्यक आहे. परंतु 'सुरक्षितता' या शब्दाचा अर्थ सरकारी व्यवस्थेतील त्रुटी झाकण्यासाठी वापरला जाऊ नये. माध्यमांना किंवा सामाजिक कार्यकर्त्यांना शाळेतील अनियमितता पाहण्यापासून रोखले गेले, तर पारदर्शकता कुठे राहणार? सरकारने नियम करावेत; पण प्रश्न विचारणाऱ्यांवर हल्ले होऊ नयेत. प्रशासनाने परवानगीची प्रक्रिया ठरवावी; पण त्या प्रक्रियेच्या नावाखाली सरकारी शाळांच्या दुरवस्थेवर पडदा पडता कामा नये. शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी माध्यमांवर सरसकट बंदी नसल्याचे स्पष्ट केले आहे. मग सीजेपीच्या टीमला कथितरीत्या अडवण्यामागचे नेमके कारण काय? राजकारण कोणतेही असो, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न पक्षीय भांडणात अडकता कामा नये. भाजपचे कार्यकर्ते दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे; आरोप खोटे असतील तर तेही स्पष्ट झाले पाहिजे. पण सत्य शोधण्याचा अधिकार कोणाच्याही राजकीय रंगावर अवलंबून नसावा. सरकारी शाळेची दुरवस्था दाखवणारा कॅमेरा हा सरकारचा शत्रू नसतो. तो आरसा असतो. प्रश्न एवढाचआरशात दिसणारे वास्तव बदलायचे की आरसाच फोडायचा?

## किडनीग्रस्त रुग्णासाठी आ.लोणीकरांची तातडीने मदत
## सिव्हिल सर्जन यांना काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी सूचना



**जालना । प्रतिनिधी**

**भाटेपुरी येथील अंकुश हरिभाऊ कचरे (वय ३० वर्षे) हे किडनीच्या गंभीर आजाराने त्रस्त असून त्यांना आवश्यक असलेली – (कावीळ–) लस तसेच पुढील उपचार तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्यात आले.**

यासंदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांचे स्वीय सहाय्यक बाबा आटोळे यांनी स्वतः जिल्हा रुग्णालयात जाऊन सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी रुग्णाची परिस्थिती सिव्हिल सर्जन यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आटोळे यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांचे त्यांच्याशी थेट बोलणे करून दिले. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित रुग्णाची अतिशय काळजीपूर्वक तपासणी करून तातडीने आवश्यक ते सर्व उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. आमदारांच्या सूचनेनंतर सिव्हिल सर्जन डॉ. गाडेकर यांनी तातडीने संबंधित डॉक्टरांची बैठक घेऊन रुग्णाला रुग्णालयात दाखल करून आवश्यक त्या सर्व तपासण्या करण्याच्या सूचना दिल्या. तसेच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार – लस उपलब्ध करून देणे आणि आवश्यक असल्यास डायलिसिसची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. दरम्यान, रुग्णाची किडनीची स्थिती गंभीर असल्याने पुढील काळात किडनी प्रत्यारोपणाची आवश्यकता भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी थेट संपर्क साधून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. रुग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी केलेल्या या प्रयत्नांबद्दल अंकुश कचरे यांच्या नातेवाईकांनी आमदार बबनराव लोणीकर, स्वीय सहाय्यक बाबा आटोळे तसेच जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे आभार मानले.

## भाई राजेश कुमार जोगदंड यांचे अन्नत्याग आंदोलन मागे

**बीड । प्रतिनिधी**

रोजंदारी मजदुर सेना मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेशकुमार जोगदंड यांनी बीड जिल्ह्यातील घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व प्रचलित कामगार कायद्याच्या सोई सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी व औष्णिक विद्युत केंद्रातील बीज कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ मिळवून देण्यासाठी बीज कंत्राटी कामगार वैजनाथ पिराजी पतंगे यांनी १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अन्नत्याग उपोषणाला सुरुवात केली होती. आज आंदोलनाचा ७ वा दिवस सुरू झाला तरी त्यांचे अन्नत्याग उपोषण सुरूच होते, जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेतली नाही तर आज ते टोकाची भूमिका घेतील असा इशारा संघटनेच्या वतीने दिला होता. त्याची दखल संबंधित अधिकाऱ्यांनी घेऊन प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी लेखी पत्र दिल्यामुळे सलग सात दिवस सुरू असलेले अन्नत्याग उपोषण तुर्तास स्थगित करण्यात आले, अशी माहिती कामगार नेते तथा रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या अधिनस्थ कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियम व प्रचलित कामगार कायद्याच्या सोई सवलतीचा लाभ आजतागायत मिळत नाही तो मिळावा, शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासन



परिपत्रक / आदेश निर्गमित केले त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करत नसल्याने त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी. तसेच औष्णिक विद्युत केंद्रातील बीज कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ मिळवून देण्यासाठी अन्नत्याग उपोषण उपसले होते. अखेर ७ व्या दिवशी लोकशाही मार्गाने आंदोलन केले त्याला यश मिळाले.वीज कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नावर मुख्य अभियंता यांनी दि . २४ ऑगस्ट २०२६ रोजी संयुक्त बैठक आयोजित केली , तर घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगारांना येत्या १५ दिवसात त्यांचे मूलभूत अधिकार व हक्क मिळवून देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांना जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी लेखी पत्र देऊन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय सीबीडी बेलापूर नवी मुंबई यांच्याकडे सादर केला जाईल असे लेखी पत्र दिले. नगरपरिषद बीड च्या सफाईची निविदा काढून कामगारांना लवकरच कामावर रुजू करण्यात येईल असे लेखी पत्र मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी दिल्यामुळे सलग ७ दिवस सुरू असलेले भाई राजेश कुमार जोगदंड यांचे अन्नत्याग उपोषण स्थगित करण्यात आले. अपर जिल्हादंडाधिकारी यांचे प्रतिनिधी महसूल सहायक शिवाजी पाटील यांनी वीज कंत्राटी कामगार वैजनाथ पतंगे यांना लिंबू सरबत दिले तर जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे प्रतिनिधी सुधाकर नागरगोजे, किशोर डमाले यांनी रोजंदारी मजदुर सेना मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड तथा सफाई कामगारांचे प्रतिनिधी यांना जलपान देऊन अन्नत्याग उपोषणाची सांगता केली, सदरील आंदोलनास भारतीय दलित पँथर चे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे सर, बीड जिल्हाध्यक्ष वैजनाथ गायकवाड यांनी पाठिंबा दिला होता.अशी माहिती रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## माजी आ.शिवाजीराव चोथे यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासोबत विविध प्रश्नावर चर्चा

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सुनेत्रा पवार यांची अंबडचे माजी आमदार शिवाजी चोथे व पक्षाचे स्थानिक पदाधिकारी यांनी सह्याद्री राज्य अतिथीगृह मुंबई येथे भेट घेतली.**

यावेळी राष्ट्रवादीच युवा नेते श्री विनायक चोथे यांनी त्यांच्या आजवरच्या राजकीय, सामाजिक, सहकार व शैक्षणिक कामाचा पुस्तक स्वरूपातील



अहवाल श्रीमती पवार यांना शहर केल्याचे प्रसिद्धी पत्रकार म्हणाले आहे. याच बरोबर माजी आमदार चोथे यांनी अंबड तालुक्यातील प्रस्तावित विकास कामांना गती देण्या बरोबरच अल्प संख्या वस्तीतील विकास कामे,सामन्यांना घरकुल योजनांचे निधी देण्याबाबत होत असलेली दिरंगाई, पिक कर्ज माफी यादीतील काही त्रुटी यासह युती मधील जिल्हा व तालुका स्तरावरील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्तेतीलसहभागा यात मित्रपक्षाकडून होत असलेली हेळसांड या विविध विषयांवर चर्चा करून पत्र दिले आहे. यावेळी अंबड न. प. चे नगरसेवक रामशेठ लांडे, तालुकाध्यक्ष सतीश धुपे, शहराध्यक्ष नंदकिशोर पुंड व युवकचे तालुकाध्यक्ष अभिजित खटके आदी उपस्थित होते.

## पंकजाताई मुंडेंच्या आश्वासनानंतर बंजारा समाजाचे आमरण उपोषण स्थगित; मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी**

**बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती अर्थात एसटी प्रवर्गात समावेश करून आदिवासी समाजाला मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलती लागू कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनद्वारे संवाद साधून मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर चव्हाण यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.**

बंजारा समाज बांधव आणि उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांच्या हस्ते पाणी



घेऊन एकनाथ चव्हाण यांनी आपले आमरण उपोषण सोडले. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते.बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, तसेच आदिवासी समाजाला लागू असलेल्या सर्व शासकीय सवलती बंजारा समाजालाही लागू कराव्यात, या मागणीसाठी एकनाथ चव्हाण यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनवरून संवाद साधला. सोमवारनंतर मुख्यमंत्री यांची वेळ घेऊन बंजारा समाजाच्या मागण्यांवर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.उपोषण स्थगित केल्यानंतर बोलताना एकनाथ चव्हाण यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांच्या शब्दांचा आम्ही आदर करीत असून, त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आमरण उपोषण स्थगित करीत आहोत. यावेळी बंजारा समाजाचे अविनाश चव्हाण, उद्धव पवार, प्रकाश चव्हाण, आंदोलक संदेश चव्हाण यांच्यासह हजारो बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते.

# पान १ वरून...

### 'प्राण देऊ पण जमीन

केले जात नाहीत. ज्या रस्त्यासाठी लोकांनी कधी अर्जही केलेला नाही, असा शक्तिपीठ महामार्ग सरकार का करत आहे?'' असा सवाल करत सरकारने हा उद्योग तातडीने बंद करावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.ङ्गतिजोरीत पैसे नसताना बाहेरून कर्ज घेऊन रस्त्याच्या कामाची निविदा काढण्याचा प्रकार सरकारने थांबवावा, अशी टीकाही त्यांनी केली. ''सर्व जिल्ह्यांतून विरोध होत असताना सत्ताधारी पक्षातील एकही आमदार शक्तिपीठ महामार्गाविषयी बोलायला तयार नाही. तुम्ही कोणाच्या बाजूने आहात, हे स्पष्ट करा. दूध का दूध आणि पानी का पानी होऊन जाऊ द्या,'' असे आवाहन जयंत पाटील यांनी केले. आमदार सतेज पाटील यांनीही आंदोलनाची भूमिका स्पष्ट करताना, ''आम्ही हा महामार्ग होऊ देणार नाही. लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन आणि मोर्चांच्या माध्यमातून हा महामार्ग रोखण्यासाठी जे काही करावे लागेल, ते करण्याची आमची भूमिका आहे. याला जशास तसे उत्तर आमचा शेतकरी बांधव देईल,'' असा इशारा दिला. मोर्चामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली होती. शक्तिपीठ महामार्गाचा निर्णय रद्द करण्याची मागणी करत आंदोलकांनी प्रशासनाला निवेदन देत पुढील काळातही आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला.

---------

### साखरेचे दर वाढल

साखरेच्या दरात वाढ झाल्याचा मलाही आनंद झाला. परंतु लगेच साखर कारखानदारांनी आधीच आम्ही साखर विकून टाकली असून, आमच्याकडे फार साखर शिल्लक राहिलेली नाही, असा कांगावा करण्यास सुरुवात केली आहे. याचाच अर्थ असा होतो की साखरेचे दर पुढच्या दोन महिन्यांत वाढवायचे असे आधीच ठरले होते. त्यामुळे व्यापाऱ्यांनी कमी दरात साखर विकत घेऊन तिथेच साखर कारखानदारांच्या गोदामात ठेवली आहे, असे आरोप शेट्टी यांनी केला. आता बाजारात येणारी साखर किरकोळ साखर कारखान्यांची असणार आहे. व्यापाऱ्यांची तसेच रिकव्हरी चोरुन रेकॉर्डमध्ये नसलेली साखर बाजारात येणार आहे. त्याच साखरेला चढ्या दराचा फायदा होणार आहे. म्हणजे हे पैसे रिकव्हरी चोरून काळा पैसा तयार करणाऱ्या कारखानदारांच्या, व्यापाऱ्यांच्या घशात जातील, अशी टीकाही त्यांनी केली. यामुळे सरकारने प्रत्येक साखर कारखान्याकडे किती साखर साठा शिल्लक आहे? याची माहिती घ्यावी. अचानक धाडी टाकून कारखाने सांगतात तेवढी साखर शिल्लक आहे की जास्त आहे? हे पाहायला हवे. आता साखरेची वाहतूक तपासली पाहिजे. त्यांच्याकडे पावत्या आहेत का? कुठेतरी २० ते २२ हजार कोटींचा संपूर्ण देशामध्ये साखरेच्या काळाबाजारामध्ये व्यवहार होण्याचा संशय आहे, असे शेट्टी यांनी म्हटले आहे. सणासुदीचा काळात देशांतर्गत पुरवठा सुरळीत व्हावा आणि साखरेच्या वाढत्या दराच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख मेट्रिक टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीस परवानगी दिली आहे.

-----------

### खासदार पुत्राच्या अटकेसाठी

संजय केदार, मनीषा सानप, मयुरी बांगर यांच्यासह ओबीसी समाजाच्या विविध संघटनांचे पदाधिकारी, सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. विविध न्याय मागण्यांचे निवेदन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ॲड.गुणरत्न सदावर्ते व घुले कुटुंबीयांच्या उपस्थितीत देण्यात आले. त्यानंतर ॲड.जयश्री पाटील व सर्वपक्षीय नेत्यांच्या हस्ते रमेश घुले व त्यांच्या कुटुंबीयांचे आमरण उपोषण स्थगित करण्यात आले. या मोर्चात समाजबांधव हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, स्व. विलास घुले यांना न्याय द्या, खासदार पुत्राला अटक करा, अशा विविध घोषणा फलकांनी लक्ष वेधून घेतले. यावेळी बीड पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. यावेळी ॲड.गुणरत्न सदावर्ते यांनी आक्रमक भाषण केले. ते म्हणाले, सीडीआर तपासात सौरभ सोनवणे यांचा संबंध आढळल्यास आठ दिवसांत त्यांना अटक करावी, अन्यथा सरकारला परिणामांना सामोरे जावे लागेल. आम्ही जशास तसे उत्तर देणारे लोक आहोत, असा इशाराही त्यांनी दिला. सुषमा घुले या लाडक्या बहिणी नाहीत का, याचे उत्तर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी द्यावे. भटक्या, ओबीसी व मागासवर्गीय समाजातील व्यक्तींवरील अन्याय रोखण्यासाठी सरकारने वेळीच पाऊल उचलावे, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी घुले कुटुंबीयांची भेट घ्यायला हवी होती. यापूर्वी एसटी महामंडळाच्या आंदोलनात आणि आरक्षणाच्या लढ्यात स्व. अजित पवार यांची भेट घेतली होती. ते मनोज जरांगे यांना महत्त्व देत नव्हते, असे सांगत पालकमंत्र्यांनी घुले कुटुंबीयांची भेट घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कोर्टातील काम आणि मुलीची परीक्षा असतानाही आपण व ॲड. जयश्री पाटील घुले कुटुंबीयांच्या न्यायाच्या लढ्यात सहभागी झालो आहोत. पोलीस ठाण्यात प्रतिसाद मिळत नसेल तर संपर्क साधावा. या लढ्यात आपण कुटुंबीयांच्या सोबत असून सरकारने जबाबदारी दिल्यास आरोपींना फाशीची शिक्षा होईपर्यंत लढा देऊ, असा निर्धार ॲड. सदावर्ते यांनी व्यक्त केला. यावेळी माजी आमदार नारायणराव मुंडे जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, धनराज गुट्टे, बळीराम खटके, बटुळे मामा यांची भाषणे झाली. यावेळी बोलताना ॲड. मंगेश ससाणे म्हणाले की, मस्साजोग प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या खा. सुप्रिया सुळे, अंजली दमानिया व सुषमा अंधारे आता कुठे आहेत? आ.संदीप क्षीरसागर, आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके कुठे आहेत? असा सवाल आरक्षण अभ्यासक ॲड. मंगेश ससाणे यांनी उपस्थित केला. धनंजय मुंडे पालकमंत्री असताना बीडचा बिहार झाला म्हणून ओरडणारे आता पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळातील घटनांवर गप्प का आहेत, असा सवालही त्यांनी केला. खा. बजरंग सोनवणे यांचा राजीनामा कोण मागणार, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नैतिकतेला जागून कठोर कारवाई करावी, अन्यथा या आगीचे रूपांतर वनव्यात झाल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला

**खा.सुप्रिया सुळे यांनी उत्तर द्यावे**

खा. सुप्रिया सुळे बीडमध्ये येऊन आरोपी कोण, हे जाहीर करतात; त्या पोलीस हवालदार आहेत काय? घुले कुटुंबीय वंजारी असल्याने त्या सांत्वनासाठी आल्या नाहीत का, याचे उत्तर त्यांनी द्यावे, असे सदावर्ते म्हणाले. यावेळी 'सुप्रियाताई, शेम.. शेम..' अशा घोषणा देण्यात आल्या. मनोज जरांगे कोणासाठी आणि कोणाला उद्देशून बोलतात, हे आता मराठा समाजालाही समजू लागले आहे. त्यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील टेंडरबाबत आम्हाला माहिती नाही, असे समजू नये, असा टोलाही त्यांनी लगावला.

-----------

### मोदींच्या २५ वर्षांच्या राजकीय

राष्ट्रीय समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. प्रत्येक राज्यात एक सात सदस्यीय समिती तयार केले जाईल, ज्यात एक राज्यमंत्री, एक संघटना सरचिटणीस आणि इतर पाच ज्येष्ठ नेते असतील. ही समिती आपापल्या प्रदेशात कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर देखरेख करेल. सेवा संकल्प महोत्सव अंतर्गत, देशभरात सुमारे १५ दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. पंतप्रधान मोदींच्या २५ वर्षांच्या सेवेचा आणि त्यांच्या विकासकामांचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमांचा उद्देश असेल. स्वच्छता मोहीम आणि रक्तदान शिबिरांसोबतच मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम आयोजित केली जाईल. जनतेच्या सोयीसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जातील, जेणेकरून जनकल्याणाला प्राधान्य दिले जाईल.

नरेंद्र मोदींची २५ वर्षे या संकल्पनेवर एक विशेष डिजिटल आणि छायाचित्र प्रदर्शन देखील आयोजित केले जाईल. यामुळे तरुण पिढीला त्यांच्या राजकीय प्रवासाची आणि सुशासनाप्रती असलेल्या त्यांच्या वचनबद्धतेची ओळख होईल. पंतप्रधान मोदींचा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी असतो. भाजप दरवर्षी या निमित्ताने सेवा पंधरवडा साजरा करते. यंदा हा पंधरवडा २ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. शनिवारच्या बैठकीत या पंधरवड्याच्या तयारीवर सविस्तर चर्चा होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दिशेने आधीच सूचना दिल्या असून, संघटना आता त्यावर पूर्ण वेगाने काम करत आहे. येत्या काही दिवसांत भाजपचे संपूर्ण लक्ष पंतप्रधान मोदींचे नेतृत्व, त्यांचे विकास मॉडेल आणि सेवा-संकल्प या संकल्पनेवर असेल.

-----------------

### सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या

मागू शकतात आणि इतर कायदेशीर उपाययोजना करू शकतात, असे त्यात नमूद केले आहे. २६ फेब्रुवारीच्या निवडणुकीच्या संदर्भात २८ फेब्रुवारी, १० मार्च आणि २९ एप्रिल रोजी भारतीय निवडणूक आयोगाकडे सादर केलेले पत्रव्यवहार आणि त्यानंतरची कागदपत्रे मागे घेण्याची मागणीही सिंह यांनी केली आहे. तसेच, राष्ट्रीय अध्यक्षांची निवड आणि पदाधिकाऱ्यांची सुधारित अंतिम यादी रद्दबातल ठरवून पक्षाच्या घटनेनुसार नवीन संघटनात्मक निवडणूक घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. २६ फेब्रुवारीच्या निवडणुकीसाठी योग्यरित्या गठित केलेले केंद्रीय निवडणूक प्राधिकरण किंवा निवडणूक निर्णय अधिकारी अस्तित्वात नव्हते, तसेच सिंह आणि इतर राष्ट्रीय प्रतिनिधींना उमेदवार सुचवण्याची, निवडणूक लढवण्याची किंवा मतदान करण्याची संधी नाकारण्यात आली होती, असा आरोप या नोटीसमध्ये करण्यात आला आहे. याबाबत पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील म्हणाले, सिंह हे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी राहिलेले नाहीत. जो काही पत्रव्यवहार करायचा आहे, तो आम्ही भारतीय निवडणूक आयोगाशी करू, असे ते म्हणाले.

---------------

### कथित पॅलेट गन गैरवापर

२० जुलै रोजी कनॉट प्लेस आणि जंतर-मंतर परिसरात झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान १९ वर्षीय साहिल लोचब हा गंभीर जखमी झाला होता. सुरक्षा दलांच्या कारवाईदरम्यान अचानक झालेल्या हल्ल्यात साहिलच्या चेहऱ्यावर आणि उजव्या डोळ्याच्या भागात छर्रे घुसले होते. घटनेनंतर त्याच्यावर लेडी हार्डिंग रुग्णालयात डोळ्याची शस्त्रक्रिया करण्यात आली असून, सध्या त्याला काळा चष्मा वापरावा लागत आहे. साहिल हा दिल्ली विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ ओपन लर्निंग'चा विद्यार्थी असून त्याने २०२४ मध्ये पोलीस भरतीची परीक्षा दिली होती; मात्र पेपरफुटीमुळे ती रद्द झाल्याने तो या आंदोलनात सहभागी झाला होता. साहिलची आई ज्योती या गेल्या अनेक दिवसांपासून गुन्हा दाखल करण्यासाठी विविध पोलीस ठाण्यांचे उंबरठे झिजवत होत्या. ''पोलिसांनी गोळीबार किंवा छर्रे झाडले नाहीत, तर मग माझ्या मुलाच्या चेहऱ्यात आणि डोळ्यात छर्रे कसे घुसले?'' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला होता. १४ ऑगस्टपासून त्यांना एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या पोलीस ठाण्यात पाठवून केवळ फेऱ्या मारायला लावल्या जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. साहिल आणि त्याच्या कुटुंबीयांची सुरू असलेली फरफट पाहून राहुल गांधी शुक्रवारी स्वतः साहिल, त्याचे कुटुंबीय आणि कायदेशीर सल्लागारांसह संसद मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचले. त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन गुन्हा नोंदवण्याची आणि तपास अधिकाऱ्यांचा (आयओ) संपर्क क्रमांक देण्याची ठाम मागणी केली. ''जोपर्यंत एफआयआर दाखल होत नाही, तोपर्यंत येथून हटणार नाही,'' असा इशारा देत राहुल आणि प्रियंका गांधी यांनी पोलीस ठाण्याबाहेरच ठिय्या दिला. विरोधी पक्षाचा वाढता दबाव आणि आक्रमक आंदोलनानंतर अखेर दिल्ली पोलिसांनी माघार घेत साहिलच्या तक्रारीवरून अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला. एफआयआरची प्रत मिळाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. या कारवाईमुळे आता आंदोलनादरम्यान नेमके छर्रे कोणी झाडले आणि विद्यार्थ्यांच्या दुखापतीस कोण जबाबदार आहे, याचा सखोल तपास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

-------------

### शाळेची पाहणी करायला गेलेल्या

तोडला गेला. महिलांनाही गुंडांनी सोडले नाही. मदन दिलावर यांच्या इशाऱ्यावर हा सुनियोजित हल्ला करण्यात आला. ४८ तासांत या सर्व गुंडांना अटक करण्यात यावी.'' ''आम्ही भाजपाच्या गुंडगिरीला अजिबात घाबरणार नाही. जनावरांच्या गोठ्यात शाळेचे वर्ग भरवले जात आहेत. या लोकांना लाज वाटायला हवी. एक वर्षापूर्वीच मी या शाळेची पाहणी केली होती. तेव्हाही ही शाळा गोठ्यात चालवली जात होती. आजही गोठ्यातच शाळा आहे. आम्ही शाळा नीट करण्याची मागणी करण्यासाठी तिथे गेलो होतो. पण आमच्यावर हल्ला करण्यात आला'', असा आरोप आशुतोष रांका यांनी केला. दरम्यान या घटनेचे अनेक व्हिडीओ आता समोर येत आहेत. आशुतोष रांका यांचे पथक गावात पोहोचल्यानंतर त्यांच्यावर हल्ला झाल्याचा व्हिडीओ पीटीआयने एक्सवर शेअर केला आहे. हा हल्ला गावातील ग्रामस्थांनी केला नसून, भाजपाच्या गुंडांनी केला आहे, असा दावाही रांका यांनी केला आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही या प्रकारावर नाराजी व्यक्त केली आहे. राजस्थानात हे काय चालले आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. भाजपाचे गुंड सीजेपीच्या कार्यकर्त्यांना लक्ष्य करत आहेत. पोलिसांनी ही घटना घडू तरी कशी दिली, असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. दरम्यान या गावातील गावकऱ्यांच्याही प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना एका गावकऱ्याने म्हटले की, आम्हाला या विषयाचे राजकारण करायचे नाही. आमच्या शाळेला १२ लाख रुपये मंजूर झाले आहेत. आम्ही शाळा बांधण्यास सक्षम आहोत. माराहण झालेल्या सीजेपीच्या कार्यकर्त्याने आरोप केला की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपाच्या गुंडांनी आमच्यावर लाठ्या-काठ्यांनी आणि दगडांनी हल्ला केला. माझा हाताला गंभीर दुखापत झाली आहे. ''आम्ही या गावातील शाळा चांगली व्हावी, यासाठी इथे आलो होतो. पण या गुंडांना मुलांच्या चांगल्या भविष्यांशी काहीतरी अडचण असावी, म्हणून त्यांनी आमच्यावर हल्ला केला. मुलांचे भविष्य सुधारले तर अडचण काय?'', अशी प्रतिक्रिया मारहाण झालेल्या कार्यकर्त्याने दिली.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात



डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आयोजित अंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धा २०२६-२७ मध्ये, विद्यापीठ स्तरावर यश प्राप्त केलेले श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव चे पदक विजेते खेळाडू (डावीकडून) कृष्णा पारसे,प्रथमेश खैरे,महारुद्र थोरात यांचा सत्कार स्वप्नीलजी चामणीकर,डॉ हेमंतजी वैद्य यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी उपस्थित प्रकाशजी दुगड,सुरेंद्रजी रेदासनी,ॲड. विश्वासजी जोशी, प्राचार्य प्रोफेसर मुकुंद देवर्षी,क्रीडा मार्गदर्शक डॉ उमेश साडेगावकर.




### जय भवानी महाविद्यालयात सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंधारण सप्ताह

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (छडड) आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमानाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय सुधाकरराव नाईक यांची जयंती जलसंधारण सप्ताह आयोजित करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान इतिहास विभाग प्रमुख प्रा. सोमनाथ घाडगे यांनी भूषविले, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पंचायत समिती पाटोदा येथील शिक्षण विभागातील महाजन साहेब यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. मॅक्स मनवे, प्रा. विनोद कीदक, डॉ. कल्पना घारगे, प्रा. ज्योती राकटे आणि प्रा. सुनील जाधव यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जलसंधारण सप्ताहाचे औचित्य साधून महाविद्यालयात वृक्षारोपण, जलसंधारण मोहीम, निबंध स्पर्धा आणि वकृत्व स्पर्धा यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहामध्ये सर्व विद्यार्थी व नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. लोखंडे आणि प्रा. गोपाळराव धांडे यांनी विशेष परिश्रम घेऊन सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते जलसंधारण व वृक्षारोपणाचा संदेश देण्यात आला.

### उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचा रुग्णांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर

बीड :- जिल्हाधिकारी कार्यालयातील तळ मजल्यावर असलेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गंभीर आजारांशी लढणाऱ्या गोरगरीब व गरजू रुग्णांना तातडीने आर्थिक मदत मिळवून देणे, हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सुविधेसाठी या कक्षाचा विशेष हेल्पलाईन क्रमांक ९६५७३५५११३ जारी करण्यात आला आहे. या वैद्यकीय सहायता कक्षामुळे जिल्ह्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी लागणाऱ्या शासकीय योजनांची माहिती मिळणे आणि उपमुख्यमंत्र्यांच्या वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळणे अधिक सोपे होणार आहे. कोणत्याही वैद्यकीय मदतीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी नागरिकांनी या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोरक्षनाथ टेकडी गुरु-शिष्य परंपरा जपणारी गादी - गुरुवर्य नवनाथ बाबा

## साधू संतांच्या उपस्थितीत अखंड हरिनाम सप्ताह आरंभ





बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सदगुरू ह.भ.प. वै. किसन बाबा महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह शुक्रवारी ११ वाजता संत महानतांच्या उपस्थितीमध्ये पुष्पवृष्टी करून आरंभ झाला.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ही नवनाथ परंपरेतील गुरु शिष्यांचा वारसा जपणारी गादी आहे. दत्तगुरु-मच्छिंद्रनाथ -गोरक्षनाथ पासून ते ह.भ.प.साधू बाबा महाराज, ह.भ.प.वै.किसन बाबा महाराज पर्यंत ही गुरु शिष्य परंपरा आहे .गोरक्षनाथ टेकडी ही गुरु शिष्य परंपरा जपणारी गादी आहे अशा भावना गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांनी व्यक्त केली

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुपूजन ह.भ.प.गुरुवर्य शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते सदगुरू ह.भ.प. वै.किसन बाबा महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीप प्रज्वलन बेलेश्वर संस्थांचे ह.भ.प. महादेव महाराज भारती व श्री क्षेत्र रामगडचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज रामगडकर व कोळवाडी येथील ह.भ.प. हरिहर महाराज भारती यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कलश पूजन ह.भ.प. वसंत महाराज लोळदगाव संस्थान ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली बेदरकर महाराज यांच्या हस्ते कलश पूजन करण्यात आले. गाथा पूजन ह.भ.प. गोपाळ महाराज शास्त्री व ह.भ.प. बाबुराव महाराज मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले ग्रंथ ज्ञानेश्वरी पूजन ह.भ.प.अखंडानंद महाराज शास्त्री ,ह.भ.प. जानकीराम महाराज घुमरे यांच्या हस्ते करण्यात आले विनापूजन ह.भ.प. अशोक महाराज चोले ह.भ.प. हनुमान महाराज शेळके यांच्या हस्ते करण्यात आले मृदुंग पूजन टाळ पूजन व हार्मोनियम पूजन ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री आंधळे ह.भ.प. रामेश्वर महाराज दराडे ह.भ.प. मसुराम महाराज कदम ह.भ.प. श्रीराम महाराज चौगुले ह.भ.प. गणेश महाराज कोयटे ह.भ.प. अनिल महाराज कासकर यांच्या हस्ते करण्यात आले टाळकरी माळकरी भजनी मंडळी यांच्या उपस्थिती होती

संत महंतांच्या उपस्थितीमध्ये श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील पुष्पवृष्टी करून अखंड हरिनाम सप्ताह आरंभ झाला यावेळी जिल्हाभरातील हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन विष्णुसहस्रनाम ज्ञानेश्वरी पारायण गाथा भजन प्रवचन हरिपाठ भावार्थरामायण हरी किर्तन संगीत भजन व हरिजागर असे विविध कार्यक्रम या सप्ताह मध्ये संपूर्ण भक्तीमय वातावरणामध्ये श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

## बंदेवाडी येथे रविवारी बाजीराव चव्हाण यांच्या वतीने महाप्रसाद



बीड । प्रतिनिधी

श्री गुरु बंकट स्वामी महाराज, श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज व लालगीर बाबा महाराज यांच्या आशीर्वादाने तसेच लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली बंदेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहानिमित्त गावात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, दररोज हरिनामाचा गजर, भजन, कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने येत्या रविवारी युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभहस्ते महाप्रसादाच्या पंगतीचा कार्यक्रम पार पडणार आहे. या महाप्रसादाचा लाभ बंदेवाडी तसेच परिसरातील भाविकांना घेता यावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजातील एकोपा, बंधुभाव आणि आध्यात्मिक संस्कार वाढविण्याचे प्रभावी माध्यम मानले जाते. सप्ताहाच्या माध्यमातून गावातील नागरिक, महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. हरिनाम सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमांमुळे गावातील वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

महाप्रसादाच्या माध्यमातून भाविकांची सेवा करण्याचा उपक्रम बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने राबविण्यात येत आहे. धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांना एकत्रितपणे प्रसाद घेण्याची संधी मिळणार आहे.

संत-महंतांच्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने सुरू असलेल्या या सप्ताहात विविध धार्मिक विधी, हरिपाठ, भजन, कीर्तन आणि नामस्मरणाचे कार्यक्रम होत आहेत. सकाळपासून रात्रीपर्यंत परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे. गावातील नागरिकांनी सप्ताहाच्या आयोजनासाठी सहकार्य केले असून, भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विविध स्तरावर नियोजन करण्यात येत आहे. रविवारी होणाऱ्या महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे नियोजन शाहू जांभळे यांच्या वतीने करण्यात आले आहे. महाप्रसादासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन पंगतीचे नियोजन, प्रसाद वितरण तसेच इतर आवश्यक व्यवस्थांची तयारी करण्यात येत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक युवासैनिक आणि ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. बंदेवाडी येथे सुरू असलेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाला परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, रविवारी होणाऱ्या महाप्रसादाच्या कार्यक्रमालाही मोठी उपस्थिती राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## हभप गोकुळ महाराज तुपे शास्त्री यांच्या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा -डाके

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील स्वराज्य नगर येथील ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते तथा किर्तनकार श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके काठवडेकर



यांच्याकडे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही चातुर्मास उत्सव मोठ्या भक्तिमय वातावरणात व आनंदात सुरू असून,

या चातुर्मास उत्सवात प्रति सोमवारी रात्री ८.०० ते ९.०० या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत,प्रज्ञावंत ज्ञानेश्वरी रसिक, अभ्यासक महाराजांच्या रसाळ व प्रासादिक प्रवचन सेवा आयोजित करण्यात येत आसतात. यावर्षीच्या चातुर्मास उत्सवातील प्रतिसोमवार प्रवचन सेवेच्या आगामी पाचव्या सत्रातील प्रवचन सेवा दिनांक २४ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी गोकुळ महाराज तुपे शास्त्री, महंत श्री क्षेत्र श्रीरामगड संथान, माळापुरी फाटा यांची आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके या फेसबुक चॅनल वरती केले जात असुन, या प्रवचन सेवेचा लाभ बीड शहर व परिसरातील परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन संयोजक श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके काठवडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# आंबेजोगाईच्या रमेश टेकाळें चा शिवसेनेतील अनाधिकृत प्रवेश व नियुक्ती रद्द

### संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी कारवाई करत दिला दणका

बीड । प्रतिनिधी

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील अंबाजोगाई चे रमेश टेकाळेचा स्थानिक काही लोकांनी शिवसेनेच्या वरिष्ठांची दिशाभूल करून व खोटी माहिती देऊन परस्पर मुंबई येथे शिवसेनेत प्रवेश करून पद मिळवले होते. दोन दिवसांपूर्वी त्याची शिवसेना-शिव उद्योग सहकार सेना अंबाजोगाई तालुकाध्यक्षपदी नियुक्तीही करण्यात आली होती. या नियुक्तीवरून पक्षातील पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून सदरील व्यक्ती बाबत खरी माहिती पक्षातील वरिष्ठांना दिल्यानंतर तसेच सत्य माहिती समोर आल्यावर वरिष्ठांशी चर्चा करून तात्काळ टेकाळे याची नियुक्ती व शिवसेनेतील प्रवेश रद्द करून संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांनी पक्ष शिस्तीच्या विरोधात जाणाऱ्यांना मोठा दणका दिला.



शिवसेना-शिव उद्योग सहकार सेना तालुकाध्यक्ष म्हणून रमेश टेकाळे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र १९ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आले होते. काही लोकांनी अधिकार नसताना लेटर पॅड वर खोटे पद टाकून शिफारस पत्र तयार करून पक्षाची व मुंबईतील काही नेत्यांची दिशाभूल करून पक्ष शिस्त मोडून पक्ष विरोधी कृती केली होती .

मात्र, नियुक्तीनंतर पक्षातील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त करून सत्यता समोर मांडल्यानंतर. संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांनी गंभीर दखल घेत चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले त्यानुसार करण्यात आलेली नियुक्ती व प्रवेश रद्द करण्यात येत असल्याचे शिव उद्योग सहकार सेनेचे प्रदेशाध्यक्ष रामेश्वर वाडेकर यांनी तात्काळ पत्र काढून जाहीर केले . जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या या निर्णयामुळे शिवसेनेत संघटनात्मक शिस्तीला प्राधान्य असल्याचा संदेश अंबाजोगाई सह जिल्ह्यात गेला असून. पदाधिकारी नियुक्ती आणि पक्षाच्या संघटनात्मक निर्णयांबाबत वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय अंतिम मानला जात असल्याचे या कारवाईतून दिसून आले .

पक्षाची व वरिष्ठांची दिशाभूल करणाऱ्या व पक्षशिस्त मोडणाऱ्या काही लोकांचे लवकरच पक्षातून निलंबन करून मोठा दणका देणार असल्याचे संकेत संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांनी दिला आहे .

## सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या खेळाडूंचे विद्यापीठ स्तरीय जलतरण स्पर्धेत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

**दोन गोल्ड व दोन रौप्य पदकाचे ठरले मानकरी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व राजर्षी शाहू कॉलेज,पाथरी.आयोजित अंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धा २०२६- २७ स्पर्धा छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धार्थ जलतरण तलावा मध्ये दिनांक २० ऑगस्ट गुरुवार रोजी संपन्न झाल्या.या स्पर्धेमध्ये श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव च्या खेळाडूंनी जलतरण स्पर्धेतील विविध प्रकारामध्ये घवघवीत असे यश प्राप्त केले.

महाविद्यालयातील जलतरणपटू महारुद्र राधाकिसन थोरात यांने (१०० मीटर बॅक स्ट्रोक) या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळवला,तर कृष्णा उत्तम पारसे याने (१०० मीटर बटरफ्लाय) या जलतरण प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळवत गोल्ड मेडल प्राप्त केले. महाविद्यालयाचाच खेळाडू प्रथमेश रेणुकादास खैरे या जलतरणपटूने (१०० मीटर बटरफ्लाय)द्वितीय व (२०० मीटर फ्रीस्टाइल) द्वितीय असे दोन प्रकारांमध्ये यश प्राप्त करत रौप्य पदक मिळवले. विद्यापीठ स्तरावर यश प्राप्त केलेल्या, खेळाडूंचे महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह स्वप्नीलजी चामणीकर, भा.शि.प्र संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंतजी वैद्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपस्थित स्थानिक सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाशजी, दुगड,अध्यक्ष सुरेंद्रजी रेदासनी, कार्यवाह ॲड. विश्वासजी जोशी, प्राचार्य प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी,क्रीडा मार्गदर्शक डॉ उमेश साडेगावकर. यांची उपस्थिती होती.

पान ६ वरुन...

### तिरुपती बालाजी दर्शनासाठी

अचानक चालत्या गाडीत आग लागली. गाडीने पेट घेतलेला पाहताच प्रवाशांमध्ये प्रचंड घबराट पसरली आणि सर्व प्रवासी तातडीने गाडीतून बाहेर पडले.

घटना घडताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्य सुरू केले व आगीवर नियंत्रण मिळवले. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवासी सुरक्षित बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला व कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र या दुर्घटनेत गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.....

### साखरेच्या दरवाढीतुन गतवर्षीच्या

भाई ॲड. गोले पाटील यांनी मांडली.

सध्या साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याने कारखानदारांना त्याचा आर्थिक फायदा होत आहे. मात्र, गतवर्षी ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा अंतिम मोबदला मिळालेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या अंतिम दराचा फेरविचार करून प्रति टन १,५०० रुपये अंतिम बिलाच्या स्वरूपात तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर कारखानदारांनी मलिदा लाटू नये, तर शेतकऱ्यांच्या उसाला अंतिम बिल प्रतिटन १५०० रु.द्यावे अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने कारखानदारांच्या विरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी दिला आहे. या निवेदनावर भाई सलीम खान पठाण, श्रीराम शेवाळे, भागवतराव कोळसे, बालासाहेब जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये

मधील सीएनसी मशीन उपलब्ध असल्याची माहिती दिली. यावेळी तज्ञ मार्गदर्शक नितीन नाईक, संस्थेचे सचिव श्री कमलाकरराव चौसाळकर व प्राचार्य रमण देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रशिक्षणार्थी सहभागी प्राध्यापकांना पाहुण्यांच्या हस्ते प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सहभागी प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त करत, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता योगेश्वरी पॉलीटेक्निक तर्फे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची प्रशंसा केली. या समारोप समारंभाचे प्रास्ताविक मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा.शाम गडदे यांनी केले. हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी प्रा.बाप्पासाहेब सोनवणे, प्रा. नंदकिशोर थोरात, प्रा.सचिन हारे यांनी मेहनत घेतली.

### महा वॉकेथॉन-वॉक फॉर

हा जलसंधारण दिन म्हणुन साजरा करण्यात येत असून यावेळी जलसंधारणाची शपथ देण्यात आली. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी जलसंधारणाच्या क्षेत्रात ऐतिहासिक आणि क्रांतीकारी पावले उचलली होती. त्यांनी सुरू केलेले जलसंधारणाचे काम आजही राज्यासाठी दीपस्तंभ ठरत आहे. महा वॉकेथॉनच्या माध्यमातून आरोग्याचा संदेश देत असतानाच, राज्यापुढील पाण्याचे संकट दूर करण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा थेंब अन्? थेंब वाचवला पाहिजे आणि जिरवला पाहिजे, हा संदेश या शपथविधीतून देण्यात आला.

महा वॉकेथॉन -वॉक फॉर वॉटर या रॅलीला पोलिस मुख्यालयाच्या मैदानावरुन प्रारंभ करण्यात आला त्यानंतर ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे क्रीडा संकुलात जावून समारोप करण्यात आला. समारोप प्रसंगी सहभाग घेतलेल्यांना प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी शालेय विद्यार्थी, क्रीडा प्रेमी, नागरिक व संबंधित यंत्रणेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसीलदार घोळवे यांची फुलसांगवी शाळेला सदिच्छा भेट

शिरूर । प्रतिनिधी



विवाह सोहळ्यासाठी आलेले तहसीलदार सुरेश घोळवे यांनी फुलसांगवी येथील जि.प. माध्यमिक शाळेला सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला आहे. नवीन अधिकारी आल्यानंतर सुरुवातीला गांगरून गेलेली विद्यार्थी तहसीलदार घोळवे साहेब यांच्यासोबत बोलके झाले सुमारे अर्धा तास विद्यार्थी आणि अधिकारी यांच्यात संवाद झाला.

शिरूर तहसील कार्यालयात ऑपरेटर म्हणून कार्यरत असलेले विजय गात यांचा विवाह सोहळा गुरुवार दि. २० ऑगस्ट रोजी फुलसांगवी येथे ज्ञानेश्वर तळेकर यांची मुलगी क्षुधा हिच्यासोबत पार पडला आहे. या नवदांपत्याला विवाहप्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी शिरूर तहसीलदार सुरेश घोळवे, नायब तहसीलदार विजय इंगळे, नायबतहसीलदार गावडेसाहेब,वरपे साहेब आदी अधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली होती. विवाह सोहळ्यासाठी कर्तव्यदक्ष तहसीलदार घोळवे व त्यांची टिम उपस्थित आहेत हे जवळच असलेल्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक शिवाजी जाधव, केंद्रप्रमुख श्रीमंत तळेकर, मोहन परभणेसर आदींना माहित झाले या अधिकाऱ्यांनी या अधिकाऱ्यांनी आपल्या शाळेला भेट द्यावी, शाळेची पाहणी करावी व शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन करावे असे त्यांना वाटले. अधिकाऱ्यांची विवाह सोहळ्याला उपस्थिती एक संधी समजून या शिक्षकांनी तहसीलदार घोळवे सरांना शाळेला भेट देण्यासंदर्भात विनंती केली. तशी घोळवे पटकन स्वीकारली ही. विवाह सोहळा संपन्न होताच तहसीलदार सुरेश घोळवे यांच्यासह सर्व टीम शाळेला भेट देण्यासाठी शाळेत गेली. इय्यता दहावीच्या वर्गामध्ये गेल्यानंतर तहसीलदार घोळवे यांनी विद्यार्थ्याची संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. अचानक वर्गात आलेल्या अधिकाऱ्यांना पाहून सुरुवातीला विद्यार्थी गांगरून गेले होते. मात्र तहसीलदार घोळवे बोलण्यातून व संवादातून विद्यार्थी हळूहळू बोलके झाले आणि सुमारे अर्धा तास विद्यार्थी आणि अधिकारी यांच्या मध्ये संवाद झाला यामध्ये इंग्रजी व विज्ञान या विषयावर चर्चा करण्यात आली. तहसीलदार घोळवे यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील काही अनुभवी यावेळी विद्यार्थ्यांना कथित केले. यामुळे तहसीलदाराच्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांचे चेहऱ्यावर काहीसे चैतन्य ही पहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी आतापासूनच अभ्यासाला लागावे व कॉफी मुक्त परीक्षा द्यावी असेही यावेळी तहसीलदार घोळवे यांच्याकडून विद्यार्थ्यांना अवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कॉफी मुक्त परीक्षा दिल्याने प्रगती घडते विद्यार्थी आपल्या प्रगतीतून सक्षम अधिकारी होतो. यामुळे अभ्यास करा असे पोट तिडकिनी तहसीलदार घोळवे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले आहे. सुमारे अर्ध्या तासाच्या संवादानंतर शाळेच्या इमारती संदर्भात विचारपूस करून शाळेच्या भौतिक सुविधाही पाहण्यात आल्या. यावेळी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक शिवाजी जाधव यांनी तहसीलदार घोळवेंसह आलेल्या अधिकाऱ्यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान केला. शाळेबाबत तहसीलदार घोळवे यांनी समाधान व्यक्त करून शाळेला आपण वारंवार भेट देत राहू आणि शाळेच्या प्रगती बद्दल सर्व मिळून प्रयत्न करू असेही या भेटी दरम्यान घोळवें यांनी अभिवचन दिले आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२६
४

# ऑगस्टमध्ये जागतिक अन्नधान्याच्या किमती स्थिर

## वाढत्या खतांच्या किमतींच्या पार्श्वभूमीवर एफएओचा विक्रमी धान्य उत्पादनाचा अंदाज

मुंबई / प्रतिनिधी

एफएओच्या मते, ऑगस्ट २०२५ मध्ये जागतिक अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात स्थिर राहिल्या, कारण मांस, साखर आणि वनस्पती तेलांच्या किमतीतील वाढीने तृणधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीतील घटीची भरपाई केली. २०२५ मध्ये मका आणि तांदळाचे विक्रमी उत्पादन अपेक्षित आहे, तर वाढत्या खतांच्या किमतींचा भविष्यातील पिकांवर परिणाम होऊ शकतो.

एफएओच्या अंदाजानुसार, २०२५ मध्ये जागतिक धान्य उत्पादन २.९६१ अब्ज टन इतके विक्रमी होईल, जे २०२४ च्या तुलनेत ३.५% अधिक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या ताज्या अहवालानुसार, ऑगस्ट महिन्यात जागतिक अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात स्थिर राहिल्या. मांस, साखर आणि वनस्पती तेलांच्या किमतीतील वाढीमुळे तृणधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांच्या किमतीतील घट भरून निघाली. प्रमुख अन्नपदार्थांच्या आंतरराष्ट्रीय किमतींच्या ट्रेंडचा मागोवा घेणारा एफएओ अन्न किंमत निर्देशांक ऑगस्टमध्ये सरासरी १३०.१ अंकांवर होता. हा निर्देशांक जुलैच्या १३०.० अंकांइतकाच होता, पण तरीही तो वर्षभरापूर्वीच्या तुलनेत ६.९% जास्त होता. एफएओ वनस्पती तेल किंमत निर्देशांक ऑगस्टमध्ये १.४% ने वाढून तीन वर्षांहून अधिक काळातील सर्वोच्च पातळीवर पोहोचला. पाम, सूर्यफूल आणि रेपसीड तेलाच्या किमतींमधील वाढीमुळे ही वाढ झाली, तर




सोयाबीनचा मुबलक पुरवठा होण्याच्या अपेक्षेने सोया तेलाच्या किमती घसरल्या. मांसाच्या किमती ०.६% ने वाढून विक्रमी उच्चांकावर पोहोचल्या, ज्यात अमेरिका आणि चीनकडून असलेल्या जोरदार मागणीमुळे बीफच्या किमती सर्वाधिक होत्या. ब्राझीलमधून होणाऱ्या मुबलक निर्यातीमुळे मेंढीच्या मांसाच्या किमती किंचित वाढल्या, डुकराच्या मांसाच्या किमती स्थिर राहिल्या आणि कोंबडीच्या मांसाच्या किमती घसरल्या. याउलट, एफएओ धान्य किंमत निर्देशांक ०.८% ने घसरला. युरोपियन युनियन आणि रशियामधील चांगल्या पिकामुळे गव्हाच्या किमती घसरल्या, तर पशुखाद्य आणि इथेनॉलसाठी अमेरिकेतील वाढत्या मागणीमुळे मक्याच्या किमती वाढल्या. निर्यातदारांना तीव्र स्पर्धेला सामोरे जावे लागल्याने तांदळाच्या किमतीही कमी झाल्या. आशियाई खरेदीदारांकडून, विशेषतः लोणी, चीज आणि दूध पावडरसाठी असलेल्या कमी मागणीमुळे दुग्धजन्य पदार्थांच्या किमती १.३% ने घसरल्या. ब्राझीलच्या ऊस पिकाबद्दलची चिंता आणि वाढत्या जागतिक आयातीमुळे, सलग पाच महिन्यांच्या घसरणीनंतर साखरेच्या किमती ०.२% ने किंचित वाढल्या.

एफएओने २०२५ मधील जागतिक धान्य उत्पादनासाठी सुधारित अंदाजही जारी केले आहेत. ब्राझील आणि अमेरिकेतील मक्याच्या चांगल्या पिकामुळे, हे उत्पादन २०२४ च्या तुलनेत ३.५% नी वाढून २.९६१ अब्ज टन इतके विक्रमी होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मका आणि ज्वारीसह जागतिक भरड धान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ अपेक्षित असून, त्यामुळे विक्रमी उत्पादनात भर पडेल. चीन, इंडोनेशिया आणि ब्राझीलमधील कमी उत्पादनामुळे नेपाळ, थायलंड आणि अमेरिकेतील तुटवडा भरून निघाल्याने, गव्हाचे उत्पादन किंचित कमी करून ८०४.९ दशलक्ष टन करण्यात आले आहे. २०२५/२६ मध्ये जागतिक स्तरावर धान्याचा वापर २.९२ अब्ज टन राहण्याचा अंदाज आहे, जो मागील वर्षाच्या तुलनेत १.६% नी अधिक आहे. त्याच वेळी, साठा ३.७% नी वाढून विक्रमी ८९८.७ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे साठा-वापर गुणोत्तर ३०.६% पर्यंत वाढेल आणि पुरवठ्याचा अंदाज समाधानकारक असल्याचे संकेत मिळतील. आशिया आणि आफ्रिकेतील गहू आणि तांदळाच्या वाढलेल्या आयातीमुळे आंतरराष्ट्रीय धान्य व्यापार १.४% नी वाढून ४९३.४ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. तथापि, एफएओच्या कृषी बाजार माहिती प्रणालीने नायट्रोजन खतांच्या वाढत्या किमती ही एक चिंतेची बाब असल्याचे अधोरेखित केले आहे आणि असा इशारा दिला आहे की पिकांच्या मूल्यांच्या तुलनेत कमी होत असलेली परवडण्याची क्षमता काही प्रदेशांमध्ये खतांच्या वापराच्या प्रमाणावर आणि पिकांच्या काढणीवर परिणाम करू शकते.

# भुईमुग पिकासाठी जिप्सम वरदान; जाणून घ्या फायदे आणि वापर

भुईमुग हे महत्त्वाचे गळीत धान्य पीक आहे. या पिकामध्ये उत्पादन वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्ये म्हणजेच नत्र, स्फुरद आणि पालाश सोबतच जिप्समचा वाटा प्रमुख आहे. जिप्समध्ये कॅल्शिअम (२४%) व गंधक (१८.६%) हे मुख्य घटक आहेत. हे दोन्ही घटक आऱ्याच्या वाढीसाठी आणि शेंगा पोसण्यासाठी उपयुक्त ठरतात.


जिप्समच्या वापराचे फायदे : जमिनीची सुपीकता वाढून ती भुसभुशीत होते. क्षारपड जमीन जिप्समच्या वापरामुळे सुधारते. बियाण्यांची उगवण क्षमता जिप्समुळे वाढते. जप्सममुळे पाण्यातील क्षारांचा निचरा होण्यास मदत होते. सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात. पिकाची अन्नद्रव्य शोषून घेण्याची क्षमता वाढते. फळांची, पिकांची गुणवत्ता सुधारते. भुईमुग पिकासाठी कॅल्शिअम व गंधक यांचा पुरवठा करण्यासाठी जिप्सम स्वस्त पडते.

जिप्समध्ये कॅल्शिअम (२४ टक्के) व गंधक (१८.६ टक्के) हे मुख्य घटक आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील प्रात्यक्षिकामध्ये जिप्समचा उपयोग केलेल्या शेतामध्ये शेंगांचे उत्पादन वाढल्याचे आढळले.

जिप्सम वापर पद्धती : भुईमुगाची काढणी होईपर्यंत शेतात घातलेला जिप्सम संपतो. म्हणून दर हंगामात या पिकाला जिप्सम द्यावा लागतो.भुईमुगाच्या पेरणीपासून २५ ते ३५ दिवसांनी फुलधारणेवेळी प्रति हेक्टरी ५०० किलो जिप्सम द्यावा. जिप्समची बारीक भुकटी फूल धरण्याच्या अवस्थेत जमिनीच्या पृष्ठभागावर शक्य तितकी झाडांच्या बुंध्याजवळ पसरून द्यावी. कारण जमिनीच्या पृष्ठभागाच्या ५ सेंटिमीटर थरातील कॅल्शिअम, आऱ्या व पोसणाऱ्या शेंगांच्या उपयोगी पडतो. जिप्समचा वापर करण्यापूर्वी माती परिक्षण करून जमिनीचा सामू किती आहे त्यानुसार जिप्समची मात्रा ठरवावी.

साधारणपणे ८ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीमध्ये इतर खतासोबत एकरी ३०० ते ५०० किलो जिप्समचा वापर करावा.





# नगदी आणि औषधी कंदपीक : सुरण लागवड



सुरण हे एक महत्त्वाचे नगदी आणि औषधी कंदपीक आहे. योग्य नियोजन आणि योग्य जमिनीची निवड केल्यास सुरणाच्या शेतीतून कमी खर्चात चांगले उत्पादन मिळवता येते.

हवामान आणि माती : सुरण पिकासाठी उष्ण आणि दमट हवामान अतिशय पोषक असते. पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सुपीक, वालुकामय किंवा मध्यम काळी माती सर्वोत्तम मानली जाते. दलदलीच्या किंवा पाणी साचणाऱ्या मातीत कंद सडण्याची भीती असते. मातीचा ६.० ते ७.५ असावा.

लागवडीची वेळ आणि बियाणे (कंद) : लागवडीची वेळ ही एप्रिल ते मे महिना (मान्सूनपूर्व) हा सुरण लागवडीसाठी सर्वात योग्य काळ आहे. लागवडीसाठी आदल्या वर्षाचे निरोगी कंद वापरले जातात. साधारण ५०० ग्रॅम ते १ किलो वजनाचे कंदाचे तुकडे (किंवा छोटे कंद) लागवडीसाठी योग्य मानले जातात. कंद कुजू नयेत म्हणून लागवडीपूर्वी कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा बुरशीनाशकाच्या द्रावणात कंद ५-१० मिनिटे बुडवून वाळवून घ्यावेत.

लागवड पद्धत आणि अंतर : जमिनीची २-३ वेळा खोल नांगरणी करून ११ फूट किंवा १.५१.५ फूट आकाराचे खड्डे खणावेत. दोन ओळींत आणि दोन रोपांत २ ते ३ फूट अंतर ठेवावे. खड्ड्यांमध्ये चांगली कुजलेली शेणखत, कडुनिंबाची पेंड आणि मातीचे मिश्रण भरून मध्यभागी कंद पुरावा.

पाणी आणि खत व्यवस्थापन : पावसाळ्यात वेगळ्या पाण्याची गरज भासत नाही. मात्र, पावसाने ताण दिल्यास किंवा उन्हाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. लागवडीनंतर २ ते ३ महिन्यांनी झाडाला भर (मातीची प्रणी) देताना सेंद्रिय खते किंवा नत्र-स्फुरद-पालशचा संतुलित डोस द्यावा.

काढणी : लागवडीनंतर साधारण ८ ते ९ महिन्यांत (नोव्हेंबर-डिसेंबर) सुरणाची पाने पिवळी पडून वाळू लागतात. पाने पूर्ण वाळल्यानंतर कंद जमिनीतून काळजीपूर्वक उकरून बाहेर काढावेत. प्रति एकर १५ ते २५ टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते.

# पावसाळ्यात जनावरांचा गोठा सुस्थितीत ठेवण्यासाठी अशी करा उपाययोजना

सध्या पावसाळ्याचे दिवस असून जनावरांसाठी योग्य निवाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक असते. यासाठी घराला लागून जनावरांचा गोठा सुस्थितीत करून घेतला जातो. कुठे पाणी गळतंय का? जमिनीवर मुरूम टाकून सपाट करणे असो, ही कामे केली जातात. जनावरांचा गोठा व्यवस्थापनाचा दूध उत्पादनावर सुद्धा परिणाम होतो. जनावरांना पावसाळ्यात सुरक्षित आणि उबदार जागा मिळणे गरजेचे आहे. या काळात गोठ्याचे व्यवस्थापन कसे करावे जाणून घेऊ या.

पावसाळ्यात गोठ्याचे व्यवस्थापन : गोठ्यामध्ये पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनिया मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा असावा. गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था



करावी. त्यांना बसण्यासाठी आरामदायी व उबदार जागा असावी. शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे. पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते त्यामुळे वेळोवेळी जमीन कोरडी होईल याची काळजी घ्यावी. दगड व माती खुरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खुरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो. हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथीघास यासारखी पिके घ्यावीत. पावसाळ्यामध्ये पश्चिमेकडून पाऊस व वारा वाहतो, त्यानुसार शेळ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी गोठ्यात आवश्यक त्या उपाययोजना कराव्या.

शेळ्यांना ठेवण्यासाठी वेगवेगळी दालने असावी ज्यामुळे आजारी शेळ्या, पिले, गाभण शेळ्या व बोकड वेगवेगळे ठेवता येतील. शेळ्यांना आवश्यक तेवढी जागा द्यावी, जेणेकरून गर्दी होणार नाही. पावसाळ्यात शेळ्यांच्या शेडच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा, तसेच शेडमधील जमिनीवरही चुना भुरभुरावा.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१६३९ : ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास (आताचे चेन्नई) शहराची सुरवात केली.
१८४८ : अमेरिकेने न्यू मेक्सिको हा प्रांत ताब्यात घेतला.
१८९४ : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांविरुद्धच्या भेदभावाविरुद्ध लढ्यासाठी नाताळ भारतीय काँग्रेसची स्थापना केली (संस्थापक चित्रीत).
१९०२ : कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना
१९०२ : मोटार वाहना मध्ये फिरणारे थिओडोर रूझवेल्ट हे अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती होते.
१९२१ : महात्मा गांधी यांनी विदेशी वस्त्राची होळी पेटवली.
१९४१ : दुसरे महायुद्ध जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.
१९४२ : दुसरे महायुद्ध ब्राझिलने जर्मनी व इटालीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४४ : दुसरे महायुद्ध सोविएत युनियनने रोमानिया जिंकले.
१९६२ : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट फसला.
१९७२ : वर्णद्वेषी धोरणाबद्दल र्‍होडेशिया (झिम्बाब्वे) ची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतुन हकालपट्टी करण्यात आली.
२०१८ : भारतीय नेमबाज राही सरनोबत यांनी २५ मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुवर्णपदक मिळवून आशियाई खेळांच्या नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. अशी कामगिरी करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४७ : प्रेशर कुकर चे निर्माते डेनिस पेपिन यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑगस्ट १७१३)
१७६० : पोप लिओ बारावा.
१८४८ : शिकागो डेली न्यूज चे स्थापक मेलविले एलिया स्टोन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९२९)
१८७७ : पाश्चात्य भारतीय संस्कृतीचे प्रारंभिक भाषांतरकार,इतिहासकार आणि भारतीय कलेचे तत्त्वज्ञ आनंद केंटिश कुमारस्वामी यांचा जन्मदिन.
१८९३ : अमेरिकन लेखक डोरोथी पार्कर यांचा जन्म.
१९०४ : डेंग जियाओ पिंग सुधारणावादी चिनी नेते (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९९७)
१९१५ : शंभू मित्रा बंगाली रंगभूमीवरील अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार (मृत्यू: १९ मे १९९७)
१९१५ : इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे रचनाकार जेम्स हिलियर यांचा जन्म. (मृत्यू: १५ जानेवारी २००७)
१९१८ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फाउंडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (मृत्यू: १५ जुलै २००४)
१९१९ : गिरीजाकुमार माथूर साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक लेखक व कवी (मृत्यू: १० जानेवारी १९९४)
१९२० : डॉ. डेंटन कूली हृदयरोपण शस्त्रक्रियेचा पाया घालणारे अमेरिकन शल्यविशारद
१९२४ : भारतीय आधुनिक हिंदी साहित्याचे प्रख्यात व्यंगचित्रकार आणि विनोदी लेखक हरिशंकर परसाई यांचा जन्मदिन.
१९३५ : पंडित गोपीकृष्ण कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. भरतनाट्यम, कथकली, मणिपुरी आदी नृत्यप्रकारांतही त्यांनी नैपुण्य मिळवले होते. १९५७ मध्ये त्यांनी ८२ दिवसांत ८७ कार्यक्रम करुन विक्रम केला. (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९४)
१९५५ : चिरंजीवी भारतीय चित्रपट अभिनेते, राजकारणी व माजी भारतीय पर्यटन मंत्री
१९६४ : मॅट्स विलँडर स्वीडीश टेनिस खेळाडू

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : फिलिप (सहावा) फ्रान्सचा राजा (जन्म: ?? १२९३)
१६०७ : लंडन कंपनीची स्थापक बर्थलॉम्व गोस्नेल यांचे निधन.
१८१८ : वॉरन हेस्टिंग्ज भारताचा पहिला गव्हर्नर जनरल (जन्म: ६ डिसेंबर १७३२)
१९६७ : जन्म नियंत्रण गोळीचे निर्मिते ग्रेगरी गुडविन पिंटस यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १९०३)
१९७८ : जोमो केन्याटा केनियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २० आक्टोबर १८९३)
१९८० : चित्रपट अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक किशोर साहू यांचे बँकॉक विमानतळावर विमानात चढत असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन (जन्म: २२ नोव्हेंबर १९१५)
१९८० : मॅकडोनेल विमानाचे निर्माते जेम्स स्मिथ मॅकडोनेल यांचे निधन. (जन्म: ९ एप्रिल १८९९)
१९८२ : एकनाथजी रामकृष्ण रानडे क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक व कन्याकुमारी येथील विवेकानंद शिला स्मारकाचे शिल्पकार. अधिकाधिक लोकांचा सहभाग असावा म्हणून मोठमोठ्या देणग्या जमा न करता एक एक रुपया जमा करुन त्यांनी विवेकानंद स्मारकाचे प्रचंड काम उभे केले आहे. (जन्म: १९ नोव्हेंबर १९१४)
१९८९ : पं. कृष्णराव शंकर पंडित ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक. राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांचा 'राष्ट्रीय गायक' म्हणून गौरव केला होता. (जन्म: २६ जुलै १८९३)
१९९५ : पंडित रामप्रसाद शर्मा संगीतकार, ट्रम्पेट व व्हायोलिनवादक. 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' याजोडीतील प्यारेलाल यांचे ते वडील होत. (जन्म:)
१९९९ : सूर्यकांत मांडरे मराठी चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते, पद्मश्री (१९७३). त्यांच्या 'धाकटी पाती' या आत्मचरित्राला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२०१४ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार यू. ए. अनंतमूर्ती यांचे निधन. (जन्म: २१ डिसेंबर १९३२)
२०१८ : गुरुदास कामत , भारतीय राजकीय नेते (जन्मतारीख: ५ ऑक्टोबर, १९५४)

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत





# जलसंधारणासाठी जालन्यात एकजूट

## जलसंधारण दिनानिमित्त 'महा वॉकेथॉन' संपन्न

जालना। प्रतिनिधी

जलसंधारणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात जलसंधारण दिनानिमित्त आज (दि.२१) रोजी 'महा वॉकेथॉन'चे आयोजन करण्यात आले होते. येथील जिल्हाधिकारी कार्यालयापासून पोलीस मैदानापर्यंत झालेल्या या वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह विविध क्षेत्रातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकररावजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महापौर वंदना मगरे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत उपस्थितांनी जलसंधारणाची शपथ घेतली. त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून वॉकेथॉनला प्रारंभ करण्यात आला. यावेळी मृद व जलसंधारण चे श्रावण उदयभान , कार्यालयीन अधीक्षक के.एस.जावळे यांची उपस्थिती होती.



येथील जिल्हाधिकारी कार्यालय, घाटी हॉस्पिटल, सत्कार कॉम्प्लेक्स, अंबड चौफुली मार्गे पोलीस मैदान असा वॉकेथॉनचा मार्ग होता. सहभागी नागरिकांनी उत्साहात ३.१ किलोमीटर महा वॉकेथॉनचे अंतर पूर्ण केले. यावेळी जलसंधारणाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा देत, पाणी बचत व जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. पोलीस मैदानावर झालेल्या समारोप कार्यक्रमात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि महापौर वंदना मगरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाची कामे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. यावेळी लकी ड्रॉमधून दहा विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. तसेच जिल्ह्यातील जलदूत, विविध सेवाभावी संस्था आणि रोटरी क्लब, जालना यांचा सन्मान करण्यात आला. या महा वॉकेथॉनमध्ये जालना शहरातील शांती निकेतन विद्यामंदिर, जिल्हा परिषद क्रीडा प्रबोधिनी, मत्स्योदरी कॉलेज, शासकीय नर्सिंग कॉलेज, जेईएस महाविद्यालय यांच्यासह विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शासकीय-निमशासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महा वॉकेथॉनमध्ये सहभागी विद्यार्थी-विद्यार्थीनी, नागरिक आणि सहकार्य करणाऱ्या विविध संस्थांचे महापौर वंदना मगरे आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आभार मानले. जलसंधारणाचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या संकल्पाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कचरू चांभारे महाराजा शिवछत्रपती शौर्य पुरस्काराने सन्मानित



बीड। प्रतिनिधी

पुरंदर तहातील अटी शर्तीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांना आग्रा येथे औरंगजेब बादशहाच्या दरबारात जावे लागले होते.तब्बल तीन महिने महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेत अडकून पडले होते.अकल्पित बुद्धीचातुर्य, अचाट साहस दाखवून मृत्यूच्या मगरमीठीतून महाराज निसटले.ती तारीख होती १७ ऑगस्ट १६६६.यावर्षी या ऐतिहासिक गरूडझेप घटनेस ३६० वर्षे पूर्ण झाली.महाराष्ट्रातील व देशातील काही राज्यातील अभ्यासू संघटना शिवरायांची गरूडझेप दिन आग्रा येथे साजरा करतात. याच दिनविशेष औचित्याने अखिल भारतीय प्रचार कार्यालय,कुरमी क्षत्रीय समाज सेवा समिती आग्रा,छत्रपती शोध संस्थान कैलहट,विश्वभुषण राजे शिवछत्रपती चेतना यात्रा आग्रा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजा शिवछत्रपती शौर्य सन्मान सोहळा आग्रा येथे आयोजित करण्यात आला होता.

शिवुर्जा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी गाडे व सचिव कचरू चांभारे हे दोघेही पोलिओग्रस्त दिव्यांग असून दिव्यांग बांधवांना घेऊन ते सातत्याने गडकोट भटकंती करत असतात.जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असलेले कचरू चांभारे हे इतिहास,गडकोटाचे अभ्यासक असून,अमोघ वाणीचे व्याख्याते म्हणून ओळखले जातात.शिवुर्जा प्रतिष्ठानच्या गडकोट भटकंती व ऐतिहासिक घटना संवर्धन कार्याची दखल घेऊन कचरू चांभारे यांच्यासह राज्यातील दहा दिव्यांगांचा आग्रा येथे महाराजा शिवछत्रपती शौर्य पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हॉटेल एस आर पॅलेसमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बी के सिंह हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून मध्यप्रदेश माजी मंत्री,राज्यसभा सदस्य राजमनी पटेल,डॉ ए एस सचान,मुख्य समन्वयक, संघटनेचे महासचिव जनार्दन देसले ,व्याख्याते डॉ सोमनाथ रोडे हे होते.

# बीडची ओळख रेशीम उत्पादकांचा जिल्हा म्हणून व्हावी-महेंद्रसिंग ढवळे

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याची ओळख केवळ 'ऊसतोड कामगारांचा जिल्हा' अशी न राहता आगामी काळात 'रेशीम उत्पादकांचा जिल्हा' म्हणून निर्माण व्हावी. यासाठी रेशीम विभाग, कृषी विभाग, ग्लोबल विकास ट्रस्ट आणि शेतकऱ्यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य रेशीम संचालनालयाचे संचालक महेंद्रसिंग ढवळे यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल, सिरसाळा येथे केंद्रीय रेशीम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रेशीम संचालनालय, जिल्हा रेशीम कार्यालय बीड, कृषी विभाग आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रेशीम उद्योग प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे होत्या. केंद्रीय रेशीम बोर्डाचे वैज्ञानिक वीर शेट्टी आणि जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात रेशीम उद्योगासाठी उपलब्ध शासकीय योजना, 'सिल्क समग्र' योजना, अनुदान, पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया याबाबत माहिती देण्यात आली. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन डॉ. अर्चना नागरगोजे यांनी दिले. केंद्रीय रेशीम बोर्डाचे वैज्ञानिक वीर शेट्टी




यांनी तुती लागवड, रेशीम किड्यांचे संगोपन, कीड व रोग व्यवस्थापन, तापमान-आर्द्रता नियंत्रण आणि स्वच्छतेच्या शास्त्रीय पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास रेशीम उत्पादनाची गुणवत्ता आणि उत्पादकता वाढू शकते, असे त्यांनी सांगितले. महेंद्रसिंग ढवळे यांनी रेशीम उद्योगासोबत शेळीपालन, कुक्कुटपालन व दुग्ध व्यवसायासारखे पूरक व्यवसाय जोडून एकात्मिक कृषी उद्योग उभारण्याचे आवाहन केले. उत्पादनाबरोबरच मूल्यवर्धनाकडे शेतकऱ्यांनी लक्ष देऊन शेतीला अधिक फायदेशीर व्यवसायाचे स्वरूप द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणी सोडविण्यासाठी रेशीम विभागाकडून आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने मुक्तेश्वर कडभाने यांनी संस्थेच्या रेशीम उद्योगातील उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचे मार्गदर्शक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, शासकीय योजनांचा लाभ तसेच बँकांच्या माध्यमातून कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात राज्य शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी बाबा सलगर यांच्यासह प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विजय गव्हाणे, कृष्णा राठोड, दत्तात्रय काळे, हनुमंत भरडे, लहू राठोड, गणेश मुसळे, डॉ. प्रवीण मांजरे, सुधाकर पोळ यांच्यासह बीड व परभणी जिल्ह्यातील रेशीम व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. सिरसाळ्यातील या प्रशिक्षणामुळे रेशीम उद्योगाच्या विस्ताराला नवी दिशा मिळून बीड जिल्ह्यात रेशीम उत्पादनाची चळवळ अधिक व्यापक होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात ग्रंथोत्सवाचे आयोजन

पाथर्डी । प्रतिनिधी

पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावी वाचन संस्कृतीला चालना मिळावी आणि विद्यार्थी पालक तसेच नागरिकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे या उद्देशाने पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयात ग्रंथोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे उद्घाटन शेवगाव पाथर्डीचे प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उद्घाटनप्रसंगी प्रांताधिकारी मते यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या विचारांची बैठक पुस्तकांमुळे तयार होते कोणतेही काम करताना आपल्या विचारांना मोठे महत्त्व असते प्रत्येकाने आयुष्यात एखादा छंद जोपासला पाहिजे आपल्या आवडीचे काम जर अर्थार्जनासाठी करता आले तर आयुष्य अधिक समाधानी होते पुस्तकांचे वाचन व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच



विचारांची व्यापकता वाढविण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले याप्रसंगी पाथर्डीचे तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी बदलत्या पिढीच्या संदर्भात वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले आजची जेन झी पिढी डिजिटल माध्यमांशी जोडलेली असली तरी समाजाच्या विकासात तिची भूमिका महत्त्वाची आहे या पिढीने आधुनिक तंत्रज्ञानासोबतच पुस्तके ज्ञान आणि वैचारिक साहित्याशी नाते जोडणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन व ग्रंथविक्री करण्यात येत आहे स्पर्धा परीक्षा शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त पुस्तके संदर्भग्रंथ साहित्यिक पुस्तके ज्ञानशाखांवरील दर्जेदार ग्रंथ या प्रदर्शनात उपलब्ध करून देण्यात आली आहेत ग्रंथ प्रदर्शनात श्री.दत्तात्रय पाष्टे डायमंड प्रकाशन सचिन कांबळे हरिती प्रकाशन सुनील लांडगे ललित ग्रंथ प्रकाशन तसेच मिलिंद काटे यांची विविध पुस्तके उपलब्ध आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षार्थी शिक्षक साहित्यप्रेमी आणि नागरिकांसाठी विविध प्रकारच्या पुस्तकांची मोठी मेजवानी या ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने उपलब्ध झाली आहे.यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा.सचिन शिरसाठ यांची तालुका क्रीडा संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त कुणाल आव्हाड सचिव दिलीपराव गर्जे माजी प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे प्रा.अशोक दौंड,प्रा.सलीम शेख सर्व प्राध्यापक शिक्षक विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ बबन चौरे सूत्रसंचालन डॉ.अभिमन्यू ढोरमारे यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ.किरण गुलदगड यांनी मानले.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज २९७/२०२६**

**महेश व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे**

अर्जदार :- १. महेश पि. राजेन्द्र थोरवे, वय २४ वर्षे, धंदा शेती, २. केशव पि. बाबुराव थोरवे, वय ७९ वर्षे, धंदा शेती, ३. प्रयागाबाई भ्र. केशव थोरवे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, ४. शुभांगी पि. राजेंद्र थोरवे लग्नापुर्वीचे नाव, शुभांगी भ्र. किरण मिसाळ लग्नानंतरचे नाव, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, ५. अंकिता पि. राजेंद्र थोरवे लग्नापुर्वीचे नाव, अंकिता भ्र. जालिंदर सांगळे लग्नानंतरचे नाव, वय २० वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ ते ५ रा. भराटवाडी ता. पाटोदा जि. बीड, अर्जदार क्र. १ ह.मु. फ्लोर नं. आर. एच. १०, स्कायवेज वृंदावन, चोवीसावाडी, च-होली बु. चारोळी बीके, चारोळी बु. पुणे, अर्जदार क्र. ४ ह.मु. खोकरमोहा ता. शिरुर का. जि. बीड, अर्जदार क. ५ ह.मु. सांगळवाडी ता. शिरुर का. जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत राजेंद्र पि. केशव थोरवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी राजेंद्र पि. केशव थोरवे यांचा मृत्यु दिनांक १५/०७/२०२६ रोजी डोंगरकिन्ही ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे वडील व आई आहेत. तसेच अर्जदार ४ व ५ हया मयताच्या विवाहित मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजेंद्र पि. केशव थोरवे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४ सप्टेंबर २०२६.

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरून,
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.
ता. पाटोदा, जि. बीड.

# जेष्ठ पत्रकार, साहित्यिक बाबासाहेब कुलकर्णी यांचे निधन

मंठा। प्रतिनिधी



येथील ज्येष्ठ पत्रकार, नाट्यकर्मी, लेखक, माजी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब उर्फ बाबाकाका कुलकर्णी यांचे काल (ता.२१) शुक्रवार रोजी सकाळी वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने मंठ्याच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांनी आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने अनेक पिढ्यांना दिशा दिली. पत्रकारिता, नाट्यकला आणि सामाजिक कार्य या विविध क्षेत्रांत त्यांनी आपल्या कर्तृत्वाची अमिट छाप उमटवली होती. साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीचा जिव्हाळा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. वयाने ज्येष्ठ असले तरी विचारांनी सदैव तरुण राहून त्यांनी नव्या पिढीला प्रोत्साहन दिले. त्यांचे मार्गदर्शन, अनुभव आणि प्रेमळ शब्द अनेकांसाठी आयुष्यभराची शिदोरी ठरले. बाबाकाकांच्या निधनाने एक ज्येष्ठ व संवेदनशील मार्गदर्शक,आणि मंठ्याच्या सांस्कृतिक चळवळीतील एक आधारवड हरपला आहे. त्यांच्या स्मृती कायमच प्रेरणादायी राहतील.त्यांच्या पार्थिवावर मंठा येथील स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक,राजकीय,पत्रकार,सर्व स्तरातील नागरीकांची आणि मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

Daily Rajya Loktantra Date 22/08/2026

**PUBLIC NOTICE**

CHANGE IN NAME
PUBLIC NOTICE OF NAME CHANGE"OLD NEME :- JADHAV VEER SINGH VINOD SINGH "NEW NEME:- VEERSINGH VINODSINGH JADHAV "ADDRESS :- ZIRPI TANDA,KAILASHNAGAR TALUKA.AMBAD, DIST. JALNA MAHARASHTRA-431204,"MOBILE NO.: 9028446413

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/५५९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १४/०८/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) सुमन त्रिंबक मंडलिक २) रामनाथ भागुजी मंडलिक सिटी स्वर्हे नं. ७९९ नं.प. घन नं. ७-१९३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (७-१९३ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- सरकारी रस्ता
पश्चिम : सिसनं ७९८
दक्षिण- सरकारी रस्ता
उत्तरः सिसनं ७९८

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# ॲट्रॉसिटी प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करा

धाराशिव : अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) दाखल असलेल्या प्रकरणांचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडितांना वेळेत न्याय मिळवून द्या, असे कडक निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पोलीस आणि संबंधित शासकीय यंत्रणांना दिले आहेत.जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक गुरुवारी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला जुलै २०२६ अखेर घेण्यात आलेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. त्यानंतर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# नऊ महिन्यांपासून वेतन रखडले; शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ



जालना। प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ विद्यालयातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मागील नऊ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, या मागणीसाठी शिक्षक संघटनेचे श्री तांदळे यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन मागील नऊ महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक अडचणींचा सामना करण्याची वेळ आली आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी तीन दिवसांत वेतनाचा प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाला एक महिना उलटूनही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेतन रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजावरही परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. दरम्यान, संबंधित शाळेत मागील सहा वर्षांपासून संस्थेचा नियमित मुख्याध्यापक नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सेवा ज्येष्ठतेच्या निकषानुसार पात्र मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र, अद्याप याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे तांदळे यांनी सांगितले. या प्रकरणाची दखल घेत सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढून कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अविनाश तांदळे यांनी केली.परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ विद्यालयातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मागील नऊ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्यासंदर्भात शिक्षक संघटनेचे श्री तांदळे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

# मुख्याध्यापक, शिक्षकाने उचलले इन्कम टॅक्स चे लाखो रुपये!

## सक्तीच्या रजेवर पाठवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

भारतीय शिक्षणाचा प्रसार करण्याच्या नावाखाली बोगस शालार्थ आयडी काढून शिक्षकांना नोकरीवर घेणाऱ्या संस्थेचा आणखी एक कारभार उजेडात आला आहे. या संस्थेच्या बीड मधील प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक आणि एका शिक्षकाने शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे इन्कम टॅक्स चे तब्बल पंधरा लाख रुपये उचलून घेतले. मात्र संस्थेने ही बाब उजेडात आल्यानंतर बदली आणि सक्तीच्या रजेवर पाठवण्या पलीकडे कोणतीच कारवाई केली नाही. या दोघांवर गुन्हा दाखल होणे अपेक्षित असताना त्यांना संस्थेने पाठीशी घातले आहे.

राज्यभर गाजत असलेल्या बोगस शालार्थ आयडी आणि शिक्षक घोटाळा प्रकरणात बीडची जी संस्था वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे आणि भारतीय शिक्षणाचा प्रसार करायचा या गोंडस नावाखाली ज्या संस्थेने मराठवाड्यात शाळांचे जाळे उभा केले आहे त्या शाळातील अनेक कुटाने आता समोर येऊ लागले आहेत.

भारतीय शिक्षणाचा प्रसार करायचा या नावाखाली या संस्थेची बीडमध्ये प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक आणि महाविद्यालय कार्यरत आहेत यातील प्राथमिक शाळेच्या एका मुख्याध्यापक असलेल्या मॅडमने सहकारी शिक्षकाच्या सहकार्याने शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे पगारातून कापून घेतले जाणारे इन्कम टॅक्स चे तब्बल १५ लाख रुपये न भरता उचलून घेतले. देशमुख नावाच्या मुख्याध्यापिका आणि जोशी नावाचा शिक्षक या दोघांनी हा कुटाणा केला मात्र त्यांना माध्यमिकच्या मुख्याध्यापकांचा देखील पाठिंबा होता की काय अशी चर्चा सुरू झाली आणि हे प्रकरण उजेडात आले. या प्रकरणाची चर्चा सुरू झाल्यानंतर संबंधित मुख्याध्यापिका देशमुख यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले तर जोशी नावाच्या शिक्षकाची दुसऱ्या जिल्ह्यात बदली करण्यात आली मात्र या दोघांनी इन्कम टॅक्स मध्ये जो अपहार केला आहे त्याबाबत संस्थेने गुन्हा दाखल करण्याची भूमिका घेतली नाही.

प्राप्त माहितीनुसार या दोघांकडून संस्थेने इन्कम टॅक्सची रक्कम वसूल केली आहे परंतु गुन्हा दाखल करण्याऐवजी त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न या संस्थेकडून जाणीवपूर्वक केला जात आहे. नागपूर अमरावती जळगाव नाशिक या जिल्ह्यात उघडकीस आलेल्या आणि महाराष्ट्रात व्याप्ती असलेल्या बोगस शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणी मराठवाड्यात शैक्षणिक जाळे पसरलेल्या या संस्थेमध्ये देखील असे प्रकार मोठ्या प्रमाणात झाल्याची माहिती आहे या संस्थेची शालार्थ आयडी प्रकरणात चौकशी देखील सुरू आहे या संस्थेचे अध्यक्ष कार्यवाह सहकार्यवाह मुख्याध्यापक यांनी हे प्रकरण मॅनेज करण्यासाठी थेट मंत्रालयापर्यंत सिस्टीम लावली आहे अशातच आता संस्थेच्या प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकाने इन्कम टॅक्स चे पैसे चोरी केल्याचे प्रकरण उघडकीस आले मात्र या प्रकरणात संस्थेकडून गुन्हा दाखल करण्याऐवजी त्या दोघांना पाठीशी का घातले जात आहे मुख्याध्यापक आणि शिक्षकाने खाल्लेले १५ लाख रुपये संस्था चालकांपर्यंत तर पोहोचले नाहीत ना अशी देखील चर्चा सुरू झाली आहे.

# माजलगावात चोरट्यांचा पाच लाखांच्या सिगारेटवर डल्ला!

**रफिक नाईक एजन्सीजचे पान मटेरियलचे दुकान फोडले; शटर तोडून चोरट्यांचा प्रवेश,जुना मोंढा परिसरात खळबळ**

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जुना मोंढा परिसरात गेल्या चार दशकांपासून पान मटेरियलच्या व्यवसायामुळे परिचित असलेल्या रफिक नाईक एजन्सीजच्या दुकानावर अज्ञात चोरट्यांनी दि २१ ऑगस्ट शुक्रवार रोजी पहाटेच्या सुमारास धाडसी चोरी केली. चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश केला आणि दुकानातील ब्रिस्टॉल गोल्ड, परफेक्ट,व्हिल्स यांसह विविध नामांकित कंपन्यांच्या सिगारेटचा मोठा साठा लंपास केला.प्राथमिक माहितीनुसार चोरी गेलेल्या सिगारेटची किंमत सुमारे पाच लाख




रुपये असल्याचे समोर येत आहे.

सकाळी दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर शटर तुटलेल्या अवस्थेत दिसल्याने दुकानदाराच्या हा प्रकार लक्षात आला. त्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करण्याचे काम सुरू केले असून, दुकानातून नेमका किती माल चोरीला गेला याची पडताळणी करण्यात येत आहे.

दुकान फोडून मोठ्या प्रमाणात सिगारेटचा साठा लंपास करण्यात आल्याने या चोरीमागे चोरट्यांचा नेमका उद्देश काय होता, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात सिगारेटचा साठा नेमका कुठे आणि कोणाला विकला जाणार होता, तसेच चोरीपूर्वी दुकानाची रेकी करण्यात आली होती का, याचा तपास पोलिसांना करावा लागणार आहे.परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.चोरीच्या घटनेनंतर जुना मोंढा परिसरात मोठी खळबळ उडाली असून, व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.चोरीच्या घटनेच्या वेळी सदरील दुकानाच्या परिसरात मोटार सायकलवरून तीन अनोळखी व्यक्ती आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत असल्याची माहिती आहे. त्यामुळे या तिघांचा चोरीच्या घटनेशी काही संबंध आहे का, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. हे संशयित नेमके कोण आहेत, कुठून आले होते आणि चोरीनंतर कोणत्या दिशेने गेले, याचा शोध घेण्यात येत आहे. या फुटेजमुळे तपासाला महत्त्वाचा धागा मिळण्याची शक्यता असून, लवकरच चोरीचा छडा लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मोफत फिजिओथेरपी शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा - सौ. मंगलाताई सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

समाजातील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्यावतीने दोन दिवसीय भव्य मोफत फिजिओथेरपी शिबीर आयोजित करण्यात आला आहे.



हे शिबिर रविवार २३ ऑगस्ट आणि सोमवार दि २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ४:३० या वेळेत जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथे घेण्यात येणार आहे.या शिबीरामध्ये कंबरदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, सायटिका,फ्रोजन शोल्डर, पॅरालिसिस, स्पोर्ट्स इंज्युरी, लहान मुलांचे विकासात्मक विकार, वृद्धांमधील चालण्याचे त्रास तसेच इतर सर्व प्रकारच्या हाडे व स्नायूंच्या दुखण्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, सल्ला व फिजिओथेरपी उपचार करण्यात येणार आहेत.या शिबीराचे वैशिष्ट्ये संपूर्ण तपासणी व सल्ला पूर्णपणे मोफत,अनुभवी प्राध्यापक व अंतिम वर्षाचे विद्यार्थी उपचार करणार,आधुनिक फिजिओथेरपी मशिन्सद्वारे उपचार,प्रत्येक रुग्णाला घरगुती व्यायामाची माहिती दिली जाईलजिजामाता फिजिओथेरपी कॉलेजतर्फे आयोजित केलेल्या मोफत फिजिओथेरपी शिबीराचा लाभ घ्या असे आवाहन माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी केले आहे.

# सोहम पारवेची उच्चशिक्षणासाठी निवड

चौसाळ । प्रतिनिधी

येथील सोहम लक्ष्मण पारवे याने एनटीए मार्फत घेण्यात आलेल्या जेईई मेन्स २०२६ परीक्षेत ९८.८० गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले. त्याची पुढील उच्च शिक्षणासाठी दिल्ली टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, दिल्ली येथे बी.ई. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल लिंगायत हटगर कोष्टी समाज संचलित 'आमची गुणी मुलं' प्रतिष्ठान, जालना यांच्या वतीने सोहमचा सत्कार करून त्याला २५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.





यावेळी 'आमची गुणी मुलं' प्रतिष्ठानच्या वतीने सोहमला प्रशस्तीपत्रक आणि २५ हजार रुपयांचा धनादेश देऊन त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले. या संस्थेच्या माध्यमातून वेळोवेळी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक तसेच शैक्षणिक मदत केली जाते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाबद्दल समाजाच्या वतीने प्रतिष्ठानचे आभार व्यक्त करण्यात आले. या सत्कार कार्यक्रमास डॉ. सुदर्शन निनाळे, आश्रूबा निनाळे, शशिकांत निनाळे, बबन निनाळे, दशरथ निनाळे, रमेश निनाळे, लक्ष्मण पारवे, ज्येष्ठ पत्रकार नागनाथ वाघमारे, बप्पा मोटे, नवनाथ तोडकर, बाळु नहार, अमोल खडके, संतोष तोडकर, कैलास तोडकर यांच्यासह समाजातील व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिरुपती बालाजी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या चालत्या प्रवासात स्कार्पीओला आग, स्कार्पीओ गाडीचे मोठे नुकसान

माजलगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथून तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या महिंद्रा स्कॉर्पिओ गाडीला (क्र.एम.एच २३,ए.एस.०११३) दिनांक २० ऑगस्ट गुरुवार रोजी रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास चालत्या प्रवासात अचानक आग लागल्याची दुर्दैवी दुर्घटना घडली आहे.ही घटना केसापुरी वसाहत परिसरातील राष्ट्रीय महामार्ग कल्याण -विशाखा पटनम या राष्ट्रीय महामार्गावर माजलगाव





शहरा जवळ घडली.

या अपघाता संदर्भात मिळालेली माहिती अशी की गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील भावीक महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी (क्र.एम.एच २३,ए.एस.०११३) दिनांक २० ऑगस्ट गुरुवार रोजी रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास तिरुपती बालाजी येथे दर्शनासाठी जात असताना कल्याण -विशाखा पटनम या राष्ट्रीय महामार्गावरील केसापुरी वसाहत येथे रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास महींद्रा स्कार्पिओ गाडीने अचानक पेट घेतला या आगीत कोणतीही प्रकाराची जिवीतहानी झालेली नाही मात्र महींद्रा स्कार्पिओ गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचेगाव येथील भाविक तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी स्कॉर्पिओ गाडीने निघाले होते. दिनांक २० ऑगस्ट गुरुवार रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास गाडी केसापुरी वसाहत परिसरात आली असता ◀◀ पान २ वर

# साखरेच्या दरवाढीतुन गतवर्षीच्या ऊसाला प्रति टन १५०० रुपये प्रमाणे अंतिम बिल द्या -भाई ॲड. नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

गतवर्षीच्या ऊस गाळप हंगामात साखरेचा दर कमी असल्याचे कारण सांगून शेतकऱ्यांना कमी दर देण्यात आला. मात्र, सध्या साखरेच्या दरात मोठी वाढ झाली असून या वाढीचा लाभ गतवर्षी ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे गतवर्षीच्या ऊसाला प्रतिटन १,५०० रुपये प्रमाणे अंतिम बिल तात्काळ अदा करावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी केली आहे.



याबाबत त्यांनी माजलगावचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन माजलगाव मतदारसंघासह जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी गतवर्षीच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अंतिम बिलापोटी प्रतिटन १,५०० रुपये तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे.

गतवर्षी साखरेचा दर सुमारे ४० रुपये किलो म्हणजे ४ हजार रुपये क्विंटल असल्याचे कारण देत शेतकऱ्यांना केवळ २,७७५ रुपये प्रतिटन दर देण्यात आला. त्यावेळी साखरेच्या दराचा आधार घेऊन उसाचा भाव ठरविण्यात आला असेल, तर आता साखरेच्या दरात झालेल्या वाढीचा लाभही शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे, अशी भूमिका ◀◀ पान २ वर

# योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये सीएनसी प्रशिक्षण उत्साहात संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे (MSBTE) प्रायोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रशिक्षण कार्यक्रम (FDP) कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक,अंबाजोगाई येथे १७ ऑगस्ट २०२६ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'सीएनसी प्रोग्रामिंग आणि मशीनिंग' (CNC Programming and Machining) या विषयावर



आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाचा समारोप समारंभ दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर उपस्थित होते. या समारोप प्रसंगी बर्दापूरकर यांनी ग्रामीण भागातील तंत्रनिकेतनमध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता योगेश्वरी पॉलीटेक्निक ◀◀ पान २ वर


# महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## जलसंधारणाच्या कामात सर्वांनी योगदान देणे आवश्यक -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

**बीड :- माती जपा, पाणी वाचवा आणि सुरक्षित महाराष्ट्र घडवा या संदेशाचा प्रसार करण्यासाठी बीड जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुपीक जमीन आणि पाण्याची शाश्वत व्यवस्था निर्माण करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी जलसंधारणाच्या कामात सक्रिय योगदान देणे आता काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.**



जिल्हा पोलिस मुख्यालयाच्या मैदानावरुन महा वॉकेथॉनला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते हिंरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला. यावेळी जलसंधारणचे कार्यकारी अभियंता सुरज लब्बा, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी प्रशांत देशमुख, जलमित्र संजय शिंदे, जलमित्र अभिमान अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल असून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. अल निनोमुळे मान्सूनची प्रणाली कमकुवत झाल्याने भूजल पातळी खालावली आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि महाराष्ट्राला पाण्याच्या संकटापासून सुरक्षित ठेवण्यासाठी केवळ शासकीय पातळीवर नव्हे, तर लोकसहभागातून जलसंधारणाची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी अडविण्यासोबतच त्याचा काटकसरीने वापर करण्याचा संकल्प आजच्या दिवशी करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महा वॉकेथॉनच्या सुरुवातीस उपस्थित सर्वांना माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारणातील उल्लेखनीय कामाचा आदर्श घेत त्यांची जयंती २१ ऑगस्ट ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26